सुविचार

एक सुस्त व्यक्ति हमेशा अपनी सुस्ती में ही व्यस्त रहता है । सुस्ती सबसे बडा विकार है ।



विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक यशवंत



श्री काशीजगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ, जंगमवाडी मठ, वाराणसी

श्री काशीजगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी तसेच श्री काशीजगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आशीर्वादाने दरवर्षी वीरशैव सिद्धांत परीक्षा घेतली जाते. वीरशैव धर्म, तत्वज्ञानाचा परिचय आबालवृद्धांना व्हावा. धर्माचा सिद्धांत कळावा. वीरशैव पंचपीठे परंपरा आणि कार्य यांचे ज्ञान व्हावे. जगद्गुरु, शरण, संत माहात्म्यांनी केलेल्या महान कार्याचे वीरशैव बांधवांना ज्ञान व्हावे म्हणून या विद्यापीठाच्या वतीने वीरशैव सिध्दांत प्रवेश, प्रबोध, प्रवीण आणि पंडित अशा तीन परीक्षा दरवर्षी घेण्यात येतात. तरी ही परीक्षा ज्या-ज्या सदभक्तांना द्यावयाची आहे, त्यांनी कृपया संपर्क साधावा असे विनम्र आवाहन करीत आहोत.

परीक्षा विभाग प्रमुख राजेंद्र नागनाथ बलसुरे - मो.नं. 9604428471
परीक्षा सहाय्यक विभाग प्रमुख गुरुशांत मल्लिनाथ रामपुरे - मो.नं. 9922088629



✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ शुक्रवार दि. ७ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१९१ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# एनडीएचा फॉर्म्यूला निश्चित ४ खासदारांमागे १ मंत्रीपद



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचा निकाल समोर आल्यानंतर यामध्ये कुठल्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही. २०२४ च्या निकालात भाजपाला २४० जागांवर समाधान मानावे लागले आहे. बहुमतापासून भाजपाला ३२ जागांनी दूर आहे. मात्र भाजपा प्रणित एनडीएला बहुमत मिळाल्याने पुन्हा इकदा देशात एनडीए सरकार बनण्याचा मार्ग मोकळा आहे. परंतु मोदी ३.० सरकारमध्ये भाजपाला मित्रपक्षांना मोठा वाटा द्यावा लागणार आहे. प्रत्येकी ४ खासदारांमागे एक मंत्रिपद असे हे सूत्र ठरल्याची बातमी पुढे आली आहे.

नितीश कुमार यांच्या जेडीयूला ३ मंत्रिपदे, चिराग पासवान यांना १ कॅबिनेट मंत्रिपद, जितनराम मांझी यांच्या हिंदुस्तान आवाम मोर्चाला १ मंत्रिपद, चंद्राबाबू नायडू यांच्या टीडीपीला ४ कॅबिनेट मंत्रिपदे तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १ कॅबिनेट आणि १ राज्यमंत्रिपद मिळणार आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १ कॅबिनेट मंत्रिपद, अनुप्रिया पटेल यांच्या अपना दलला १ मंत्रिपद तर जयंत चौधरी यांच्या पक्षाला १ मंत्रिपद आणि पवन कल्याण यांच्या जनसेनेला १ मंत्रिपद देणार असल्याचे सांगितले जात आहे. भाजपा एनडीए सरकारमध्ये महत्त्वाची ४ खाती स्वत:कडे ठेवणार आहे.

भाजपा स्वत:कडे गृह, वित्त आणि संरक्षण मंत्रालयासह आणखी एक महत्त्वाचे खाते ठेवणार आहे. उत्तार प्रदेश, बिहार आणि महाराष्ट्र या तीन राज्यांना डोळ्यासमोर ठेवून महत्त्वाची खाती या राज्यांना दिली जाणार आहेत. एनडीएच्या वाटाघाटीत लोकसभा अध्यक्षपद, अर्थ, गृह आणि रेल्वे मंत्रालयात या खात्यावरून रस्सीखेच सुरू आहे. मात्र गृह आणि अर्थ खाते भाजपा सोडणार नाही. रेल्वे खाते मित्रपक्षांना दिले जाऊ शकते. नितीश कुमार यांनी रेल्वे मंत्रालयासाठी आग्रह धरलेला आहे. त्यामुळे त्यांच्या वाट्याला रेल्वे मंत्रालय जाते का हे पाहणे गरजेचे आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणूक निकालात गेल्या वेळीच्या तुलनेत भाजपाची पिछेहाट झाल्याचे पाहून एनडीएतील घटक पक्षांच्या मागणीत वाढ झाली आहे. प्रत्येक पक्ष अधिकची मंत्रिपदे मागत आहे. एनडीएला २९३ जागांसह बहुमत मिळाले आहे. त्यात भाजपाला २४० जागा, तेलुगु देसम पार्टीला १६ आणि जनता दल यूनाइटेडला १२ जागांवर विजय मिळाला आहे. त्यामुळे जेडीयू आणि टीडीपी हे किंगमेकर बनले आहेत.

## महिला जवानने लगावली कानशिलात कंगनाचा आरोप

नवी दिल्ली - अभिनेत्री आणि मंडी लोकसभा मतदारसंघातील भाजपच्या विजयी उमेदवार कंगना रणौतच्या कानशिलात लगावली असल्याची माहिती समोर आली आहे. चंदिगड विमानतळावर सीआयएसएफच्या महिला जवानाने कानशिलात लगावली असल्याचा आरोप अभिनेत्री कंगना रणौतने केला आहे.

हिमाचल प्रदेशमधील मंडी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक जिंकल्यानंतर कंगना रणौत आज दिल्लीला रवाना झाली. त्या दरम्यान ती चंदिगड विमानतळावर असताना तिला सीआयएसएफच्या महिला जवानाने मारहाण केली असल्याचे आरोप कंगनाने केला आहे.

समोर आलेल्या वृत्तानुसार, कंगनाने शेतकरी आंदोलनादरम्यान महिला आंदोलकांबाबत वक्तव्य केले होते. त्याच वक्तव्यावर नाराज असलेल्या सीआयएफएफच्या महिला जवान कुलविंदर कौर यांनी (पान ७ वर)

# काँग्रेसच्या खासदारांचे शतक पूर्ण विशाल पाटील काँग्रेसमध्ये दाखल

नवी दिल्ली : महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वात जास्त लक्ष वेधून घेतलेल्या सांगली लोकसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार विशाल पाटील १ लाखांच्या मताधिक्यांनी जिंकून आले. याठिकाणी मविआकडून उद्धव ठाकरेंनी उमेदवार दिला होता. मात्र ठाकरेंची मशाल पाडून विशाल पाटील खासदार झाले. आता त्याच विशाल पाटलांनी विश्र्वजित कदमांसोबत दिल्लीत जात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे पाठिंबा पत्र दिले आहे.

मल्लिकार्जुन खरगे यांनी ट्विट करून याबाबत माहिती दिली आहे. ते म्हणाले की, महाराष्ट्रात अहंकारी राजकारणाला जनतेने पराभूत केले. सामाजिक न्याय, समता आणि स्वातंत्र्यांसाठी लढणा-या छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या आपल्या प्रेरणादायी दिग्गजांना ही योग्य श्रद्धांजली आहे. सांगलीतील



खासदार विशाल पाटील यांनी काँग्रेसला पाठिंबा दिल्याचे त्यांनी सांगितले. विशाल पाटलांच्या या पाठिंब्यामुळे देशात काँग्रेस खासदारांनी शतक गाठल्याचे दिसून येते.

ठाकरेंनी व्यक्त केली होती नाराजी

सांगली लोकसभा मतदारसंघात उद्धव ठाकरेंनी चंद्रहार पाटलांना उमेदवारी दिली होती. मात्र त्याठिकाणी काँग्रेस नेते विशाल पाटील इच्छुक होते. मात्र काँग्रेसचा विरोध डावलून ठाकरेंनी चंद्रहार पाटलांची उमेदवारी कायम ठेवली. त्यामुळे विशाल पाटलांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला. याबाबत ठाकरे गटाकडून विशाल पाटलांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. विशाल पाटलांना त्यांच्या नेत्यांनी समजवावे असे उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. मात्र ठाकरे गटाचा विरोध डावलून सांगलीत काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विशाल पाटलांचा प्रचार केला. त्यामुळे या निवडणुकीत विशाल पाटील विजयी झाले.

दरम्यान, सांगली लोकसभा मतदारसंघाचे भाजपा उमेदवार संजय पाटील यांनी २०१४ आणि २०१९ असे दोनवेळा मतदारसंघाचे नेतृत्व केले. २०२४ च्या निवडणुकीत त्यांची हॅट्रिक होणार होती, पण पक्षातंर्गतच विरोध झाल्यामुळे त्यांची हॅट्रिक हुकली आहे. केंद्र (पान ७ वर)

# पराभव झाला तरी चालेल अजितदादांची साथ सोडणार नाही

## बैठकीत आमदारांचा एकमताने निर्धार

मुंबई- लोकसभा २०२४ च्या निवडणुकीनंतर आज अजित पवार यांच्या नेतृत्वात मुंबईतील ट्रायडन्ट हॉटेलमध्ये राष्ट्रवादी (अजित पवार गट) च्या आमदारांची बैठक झाली. या बैठकीत पराभव झाला तरी चालेल, पण अजित पवार यांची साथ सोडणार नाही, असं आमदारांनी एकमताने निर्धार केल्याची माहिती समोर आली आहे. तसेच कुठलाही आमदार शरद पवार यांच्या पक्षातील आमदारांच्या संपर्कात नसल्याची ग्वाही देखील बैठकीला उपस्थित असणाऱ्यांनी दिल्याचं सांगण्यात येत आहे.

राष्ट्रवादी फुटल्यानंतर ४० हून अधिक आमदार हे अजित पवारांसोबत गेले होते. असं असलं तरी लोकसभा निकाल लागल्यानंतर शरद पवारांना मोठं यश मिळालं. शरद पवारांनी १० पैकी ८ खासदार हे निवडून आणले. तर दुसरीकडे अजित पवारांचा एकच खासदार निवडून आला. अजित पवार हे सुनेत्रा पवारांनाही निवडून आणू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांमध्ये आता चलबिचल सुरू असल्याची माहिती समोर येत होती.

तटकरे, मुंडे भाजपसोबत जातील- रोहित पवार

लोकसभेच्या निकालानंतर अजित पवार गटाचे काही आमदार शरद पवार आणि भाजपच्या संपर्कात असल्याचा दावा रोहित पवार यांनी (पान ७ वर)

# शेअर मार्केटमधील सर्वात मोठा घोटाळा

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीतील मतदानाच्या शेवटच्या दिवशी आलेले एक्झिट पोल आणि त्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शेअर मार्केटबद्दल केलेल्या विधानांचा दाखला देत काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी गंभीर आरोप केले आहेत. सरकारच्या माध्यमातून ठरवून शेअर मार्केटबाबत संभ्रम निर्माण करण्यात आला आणि यासाठी खोट्या एक्झिट पोल्सचा आधार घेण्यात आला, असा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. शेअर मार्केटच्या इतिहासातील हा सगळ्यात मोठा घोटाळा असून याा संपूर्ण प्रकरणाची जेपीसीच्या माध्यमातून चौकशी करण्यात



यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

शेअर मार्केट घोटाळ्याचा आरोप करताना राहुल गांधी म्हणाले की अमित शाह यांनी आधी मे महिन्यात लोकांना शेअर्स खरेदी करण्याचे आवाहन केले आणि ४ जूननंतर आमच्या जागा ४०० पार होणार असल्याचे सांगत शेअर्सच्या किंमती वाढतील, असा दावा केला. ज्या चॅनलला शाह यांनी मुलाखत दिली होती त्याच चॅनलला दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान मोदी यांनीही शेअर्सबाबतचे आवाहन केले. त्यानंतर १ जून रोजी खोटे एक्झिट पोल आणून शेअर मार्केटमध्ये संभ्रम निर्माण केला गेला. मात्र ४ जून रोजी खरा निकाल आल्यानंतर सर्व शेअर्स पडले.

या सगळ्यात सर्वसामान्य गुंतवणूकदारांचे तब्बल ३० लाख कोटी रुपये बुडाले आणि काही मोजक्या परदेशी गुंतवणूकदारांना हजारो कोटी रुपयांचा फायदा झाला. हा सगळ्या एका मोठ्या कटाचा भाग होता असा घणाघाती आरोप राहुल गांधींकडून करण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांकडून लाच घेताना रंगेहाथ पकडले

## पोलीस उपनिरीक्षकासह हवालदार एसीबीच्या ताब्यात

चाकूर, ता. ६ (बातमीदार) : शेतातील सामायिक बंधाऱ्यावरील झाड तोडण्याच्या कारणावरून झालेल्या भांडणात गुन्हा दाखल झाल्यानंतर, गुन्ह्याच्या कामात मदत करून अटक न करण्यासाठी पोलिस उपनिरीक्षक व पोलिस हवालदाराने २० हजार रूपयाच्या लाचेची मागणी केली होती. यात गुरूवारी (ता.६) दुपारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तहसील कार्यालयाच्या प्रांगणातून पोलिस हवालदाराला लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे तर पोलिस उपनिरीक्षकाला पोलिस ठाण्यातून ताब्यात घेतले आहे. शेतातील सामायिक बांधावरील झाड तोडण्याच्या कारणावरून भावकितील व्यक्तींची भांडणे झाली होती. यात परस्परविरोध तक्रारीवरून दोघांविरूध्दही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २५ वर्षीय तक्रारदार व त्याच्या वडीलांना सदर गुन्ह्याच्या तपास कामात मदत करून गुन्ह्यात अटक न करण्यासाठी पोलिस हवालदार पांडुरंग दाडगे व पोलिस उपनिरीक्षक दिलीप मारे यांनी २५ हजार रूपयाच्या लाचेची मागणी केली होती.

मंगळवारी (ता.४) शासकीय पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता पोलिस हवालदार दाडगे यांने तक्रारदारांकडून तडजोडीअंती २० हजार (पान ७ वर)









नवीन निवडून आलेले खासदार श्री शिवाजी काळगे यांचे श्री. बसवराज पाटील नागराळकर यांनी आ. अमित देशमुख यांच्या उपस्थितीत स्वागत केले. याचबरोबर श्री. मन्मथअप्पा पंचाक्षरी, श्री. ओमप्रकाश झुरूळे, श्री. बालाजी पिंपळे, डॉ. भालचंद्र पैके, श्री. गुलाब पाटील, श्री. बसवेश्वर हेंगणे यांनीहि डॉ. शिवाजी काळगे यांचे स्वागत करून अभिनंदन केले.

# लातूर कृषि महाविद्यालय परिसरात मियावाकी जंगल



लातूर, / प्रतिनिधी- येथील लातूर कृषि महाविद्यालयाच्या ४ एकर जागेवर सामाजिक वनीकरण विभागाच्यावतीने मियावाकी स्वरुपाचे जंगल साकारले जाणार आहे. पर्यावरण दिनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून या उपक्रमास प्रारंभ झाला.

कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिव्याख्याता तथा प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी अमितराज जाधव, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, लातूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी तुकाराम भालके यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होत्या.

कृषि महाविद्यालय परिसरात वृक्ष लागवड करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभाग आणि कृषि (पान ७ वर)

## देवेंद्र फडणवीसांची दिल्लीत श्रेष्ठींशी चर्चा

मुंबई,६- उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारमधून म ोकळे करून पक्षात जबाबदारी देण्याची विनंती पक्षश्रेष्ठींना करण्याचे जाहीर केल्यावर त्यांना वरिष्ठ नेत्यांनी तातडीने नवी दिल्लीत पाचारण केले. फडणवीस यांनी बुधवारी रात्रीच दिल्लीला जाऊन पक्षश्रेष्ठींशी चर्चा केली. तीन पायांच्या सरकारमधून बाहेर पडण्याच्या निर्णयावर फडणवीस ठाम असल्याचे सूत्रांनी सांगितले. फडणवीस यांनी मुंबईला परतल्यावर सकाळी नागपूरला प्रयाण केले. त्यानंतर ते सायंकाळी पुन्हा नवी दिल्लीला जाणार असून शुक्रवारी संसदीय पक्षाच्या बैठकीत सहभागी होणार आहेत.

लोकसभा निवडणुकीतील मुद्दे केंद्रीय पातळीवरील असताना आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व व सरकारची कामगिरी यावरून झालेल्या निवडणुकीत महाराष्ट्रात आलेल्या अपयशाचे खापर (पान ७ वर)

# खा. डॉ. शिवाजी काळगे यांचे जल्लोषात स्वागत

लातूर (प्रतिनिधी): लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार, नूतन खासदार डॉ.शिवाजी काळगे यांचा प्रचंड मताधिक्याने विजय झाला. आज बुधवार दिनांक ५ जून २०२४ रोजी सकाळी लातूर शहरातील काँग्रेस भवन येथे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचे महाविकास आघाडी सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून जल्लोषात स्वागत करण्यात आले.



यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख,माजी आमदार ईश्वरराव भोसीकर,माजी आमदार रोहिदास चव्हाण,माजी आमदार वैजनाथ शिंदे,माजी आमदार त्रंबक भिसे, शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या आशाताई श्यामसुंदर शिंदे,शेकापचे ॲड उदय गवारे,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते एकनाथ पवार,बालाजी रेड्डी काँग्रेसचे लातूर लोकसभा निरीक्षक अमर जाधव,प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोक पाटील निलंगेकर, सचिव अभय साळुंखे,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सोमेश्वर कदम,लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे,शहर जिल्हा अध्यक्ष ॲड किरण जाधव,विद्याताई पाटील, महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

लातूरचे नूतन खासदार डॉक्टर शिवाजीराव काळगे यांचे काँग्रेस भवन येथे आगमन झाल्यावर ढोल ताशाच्या गजरात पुष्पवृष्टी करून जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले.महाविकास आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विजयाचे लाडू वाटून फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला. लातूर लोकसभा मतदारसंघातील लातूर शहर,लातूर ग्रामीण,अहमदपूर,उदगीर ,लोहा कंधार ,निलंगा विधानसभा मतदारसंघातील (पान ७ वर)



# लातूर लोकसभा निवडणूक २०२४
## डॉ. शिवाजीराव काळगे प्रचंड बहुमतानी विजयी

अहमदपूर (कारामुंगीकर) लातूर लोकसभा निवडणुकीमध्य डॉ शिवाजीराव काळगे हे ७६००० हजार मतांनी विजयी झाल्याबद्दल शिरूर ताजबंद येथील नागरिकांनी माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील यांची शिरूर ताजबंद येथे भव्य दिव्य असी मिरवणूक काढूण जल्लोष साजरा केला व महेश मंदीरामध्ये आरती करून छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये गुलाल व पेढे वाटून आनंद उत्सव साजरा केला .

तसेच या प्रसंगी चेअरमन.श्री तुळशीरामजी भोसले,सुरेंद्र पाटील, राजू खंदाडे,प्रकाश वलसे, शिवानंद भोसले, गिरीश देशमुख, हरिभाऊ येरमे, रामभाऊ बेल्हाळे, रणधीर पाटील,निळकंठ पाटील, अमीर सौदागर,मोहन पाटील, संजय वाघमारे, एन.टी.बिराजदार,विनायक पाटील, बालाजी पाटील,मोहन पाटील, मुन्ना शेख,दिलीप मोरे,तूकाराम गोरे, भगवान मोरे, लक्ष्मण गवळी, फिरोज शेख, अब्बास तांबोळी, सद्दाम शेख, समीर शेख, राहुल भालेराव, जयवंत सगर, गणेश माने, राहुल वाघमारे, भगवान मोरे, बाळासाहेब डोंगरे , विक्रम भोसले.शिरूर ताजबंद येथील नागरिकांनी माजी मंत्री विनायकराव पाटील यांची हार, फटाके,गुलाल उधळून, आणि ढोल ताशा वाजवून मिरवणूक संपूर्ण शिरूर ताजबंद येथून मोठ्या उत्साहामध्ये आणि जल्लोषात मध्ये मिरवणूक काढण्यात आली.

## लिंबा दिवेकर यांचे निधन



अहमदपूर (कारामुंगीकर)- स्मृतीशेष लिंबाबाई नामदेव दिवेकर यांचे आज संध्याकाळी वृध्दपकाळाने त्यांच्या गावी दु:खद निधन झाले.

त्यांचा अंत्यविधी उद्या गुरूवार दि. ६ जून २ज२४ रोजी दुपारी १२:जज वाजता आनंदवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे होणार आहे. आनंदवाडी हे गाव शिरूर अनंतपाळच्या तहसील कार्यालयासमोर २ कि.मी. वर आहे. स्मृतीशेष लिंबाबाई या म लसाकम म चे जेष्ठ कार्यकर्ते शिरीष दिवेकर यांच्या चुलती आहेत. त्यांच्या मृत्यूमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त मनपाच्या वतीने वृक्षारोपण




लातूर/प्रतिनिधी:बुधवारदि.५जूनरोजीपर्यावरण दिनानिमित्त लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध संस्था व संघटनांच्या सोबतीने वृक्षारोपण करण्यात आले.

मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या सूचनेनुसार वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. शहरातील शिक्षक कॉलनी परिसरातील ग्रीन बेल्टवर वृक्षारोपण करण्यात आले.सह्याद्री देवराई,लातूर वृक्ष,वुई फाऊंडेशन आणि स्टीम एज्युकेशन सेंटर यांच्या सहकार्यातून जिल्हा क्रीडा संकुल येथेही वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी लहान बालके,शालेय विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांनी वृक्षारोपण केले.स्टीम एज्युकेशन सेंटर मधील विद्यार्थ्यांसोबत वृक्षदिंडी काढण्यात आली.झाडे लावा ,झाडे जगवा, मधरती वाचवुया असा संदेश या दिंडीच्या माध्यमातून देण्यात आला. सहाय्यक आयुक्त मंजुषा गुरमे यांच्यासह मनपाच्या उद्यान विभागातील सर्व अधिकारी-कर्मचारी,वृक्ष समितीचे सदस्य सुपर्ण जगताप,पोलीस निरीक्षक दयानंद पाटील,प्रा.ओमप्रकाश झुरुळे,डॉ. पाटील,प्रकाश घादगिने, डॉ.बरमदे,आर्किटेक्ट बांगड यांच्यासह असंख्य वृक्षप्रेमींची यावेळी उपस्थिती होती.


## ए.एच.रिझवी हायस्कूल, हडोळतीचे दहावी परीक्षेत घवघवीत यश

हडोळती प्रतिनिधी:- हडोळती येथील ए.एच.रिजवी हायस्कूल चा दहावीचा निकाल १००% टक्के लागला असून,शेख इखरा अल्फिया साजिद हिने ८७.४०% गुण घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला तर शेख फिजा बशीर हिने ८६.८०% गुण घेऊन द्वितीय व शेख सिमनफातेमा वाजिद हिने ८४.००% गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला.

विशेष प्राविण्यासह १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून,प्रथम श्रेणीत १० विद्यार्थी तर,द्वितीय श्रेणीत ०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेच्या या यशाबद्दल संस्था अध्यक्ष अब्दुल मुजीब पटेल जागीरदार,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अ. मजीद जागीरदार, गदवाल एन. आय.,प्राथमिकचे मु.अ.शोएब जागीरदार,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पु अहिल्यादेवीची सादिया नीट मध्ये ६६२ गुण घेऊन ग्रामीण भागातून अव्वल





अहमदपूर दि. ०६ (प्रतिनिधी)- तालुक्यातील सांगवी सु येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु.सय्यद सादिया महेताब हिने नीटच्या परीक्षेत ७२० गुणांपैकी ६६२ गुण घेऊन ग्रामीण भागातून अव्वल स्थानी आली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,५ मे रोजी झालेल्या नीटच्या परीक्षेचा निकाल आज देशात जाहीर झाला. या निकालात येथील पु अहिल्यादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान कामगिरी बजावली.ज्यामध्ये सय्यद सादिया महेताब हिने ६६२ गुण घेत तालुक्यातील ग्रामीण भागातून अव्वल क्रमांकावर आली असून भौतिक,रसायन, जीवशास्त्र या विषयात अनुक्रमे ९९.२२,९६.९८,९९.१३ पर्सेंटाइल घेत एकूण ९९.१३ पर्सेंटाइल घेतली आहे.ऑल इंडिया रँक १९६०४ आहे तर साळवे यशवंत भीमराव याने५४१ गुण प्राप्त केले.या उत्तुंग यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके पाटील साहेब, संस्थेच्या सचिव तथा भाजपाच्या महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव प्राचार्या रेखाताई तरडे हाके, संस्थेच्या उपाध्यक्षा ॲड मानसी हाके, संस्थेचे कोषाध्यक्ष अमरदीप हाके , गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे आदींनी अभिनंदन केले आहे.

## सुधाकर श्रृगारे यांना अहमदपूर विधानसभा मतदारसंघातून मताधिक्य हे भाजपाचे श्रेय : जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख

अहमदपूर (प्रतिनिधी)- नुकत्याच झालेल्या लातूर लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्ष व महायुतीचे उमेदवार म्हणून सुधाकरराव श्रृगारे यांनी निवडणूक लढवली असुन अहमदपूर विधानसभा मतदारसंघातून सुधाकर श्रृगारे यांना ३,५१८ चे मताधिक्य मिळाले असून सदरील मताधिक्याचे सर्व श्रेय भारतीय जनता पक्षाच्या मेहनतीचे असुन महायुती मधील इतर घटक पक्षाने श्रेय लाटण्याचा केविलवाणी प्रयत्न करु नये असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे



जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी केले आहे. महायुती मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार यांचा या लोकसभा निवडणुकीमध्ये महायुती च्या उमेदवाराला काहीच मदत झाली नसुन स्वताच्या शिरुर ताजबंद येथून सुद्धा काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला मताधिक्य मिळाले आहे. महायुतीचे उमेदवार सुधाकर श्रृगारे यांना जे काही मताधिक्य अहमदपूर विधानसभा मतदारसंघातून मिळाले आहे ते फक्त भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या ताकदीमुळेच असुन याचे श्रेय महायुती मधील इतर कोणत्याची घटक पक्षाच्या नेत्यांनी घेऊ नये असेही शेवटी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी सांगितले आहे.

# शाहू महाविद्यालयाचे नीट-युजी-२०२४ परीक्षेत घवघवीत यश

लातूर - नीट-युजी-२०२४ परीक्षेचा निकाल मंगळवार दि. ०४ जून, २०२४ रोजी दुपारी ४-०० वा. जाहीर झाला. त्यामध्ये शिव छत्रपती शिक्षण सस्थेअंतर्गत येणा-या राजर्षी शाहू (विज्ञान) महाविद्यालय व संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा उज्वल यशाची परंपरा राखली आहे. यावर्षी महाराष्ट्रातून २,८२,०५१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली, २,७५,४५७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, त्यापैकी १,४२,६६५ विद्यार्थी पात्र ठरले.

महाविद्यालयाचा १९१० विद्यार्थ्यांचा निकाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार प्रथमच १४ विद्यार्थ्यांना ७०० पेक्षा अधिक गुण प्राप्त झाले. ६० विद्यार्थ्यांना ६७५ पेक्षा अधिक, १३७ विद्यार्थ्यांना ६५० पेक्षा अधिक, २५८ विद्यार्थ्यांना ६२५ पेक्षा अधिक, ४१४ विद्यार्थ्यांना ६०० पेक्षा अधिक व तसेच ५५० पेक्षा अधिक गुण असणारे ७११ आणि ५०० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ९८३ विद्यार्थी आहेत.




सार्थ प्रशांत पाटील या विद्यार्थ्याने ७१५ गुण प्राप्त करून सर्वसाधारण गटातून देशात २५२ वा रँक व महाविद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला आहे, शिवम् कैलास अग्रवाल ७१० गुण मिळवून ईडब्ल्यूएस संवर्गातून देशात ४४ वा रँक व महाविद्यालयातून सर्वद्वितीय आला आहे. कु. मनस्वी संजय मस्के ही विद्यार्थीनी ७०७ गुण मिळवून महाविद्यालयातून मुलीत सर्वप्रथम आली. लक्ष्मण प्रकाश कदम ७०५ गुण, श्रेयश विक्रम आळंगेकर ७०५ गुण, शशी गोकुळदास कदम ७०५ गुण, अभिनव उदय खोपटीकर ७०१ गुण, कु. प्रांजली पोपट नेटके ७०० गुण इतर मागासवर्गीय संवर्गातून ५८६ रँक, अदित्य तानाजी वाघलगावे ७०० गुण, कु. प्रीती प्रभाकर पडघन ७०० गुण, प्रथमेश मलकारी आरगे ७०० गुण, कु. हजरा तहरीम सईद शेख ७०० गुण, प्रथमेश बाळासाहेब चव्हाण ७०० गुण, कु. उर्वी भाऊराव यादव ७०० गुण प्राप्त केले आहे. सुमित सुभाष अमिलपूर ६६३ गुण मिळवून अनुसूचित जाती संवर्गातून महाविद्यालयात प्रथम आला आहे त्याचा देशात ३७८ रँक आहे तर कु. साक्षी सुखदेव जाधव ६५० गुण प्राप्त करून अनुसूचित जमाती संवर्गातून महाविद्यालयात प्रथम तर देशात १४५ व्या क्रमांकावर आहे व ओम लक्ष्मीकांत राठोड ६०६ गुण प्राप्त करून दिव्यांग गटात देशात ८१ व्या क्रमांकावर आहे. महाविद्यालयात नीट-युजी परीक्षेची पुर्नतयारीसाठी इन्स्पायर (रिपीटर) बॅचचे विशेष वर्ग दरवर्षी चालविले जातात. या बॅचचा निकाल पुढील प्रमाणे आहे. संवेद ज्ञानदेव साळुंके ६९५ गुण प्राप्त करून महाविद्यालयातून प्रथम, भाविक दिलीप बेनके (ओबीसी संवर्गातून प्रथम) व श्रीराज अतुल इंगोले ६९० गुण मिळवून संयुक्तरित्या द्वितीय आले आहेत, ऋषिकेश प्रदीप शिंदे ६८६ गुण मिळवून तृतीय क्रमांकावर आहे. कु. समृद्धी धम्म भालेराव ६५९ गुण मिळवून अनुसूचित जमाती संवर्गातून महाविद्यालयात प्रथम तर कु. संजना सायलू बसलवार ६२० गुण प्राप्त करून अनुसूचित जमाती संवर्गातून प्रथम व कु. पल्लवी दिनकर दराडे ६१३ गुण प्राप्त करून दिव्यांग गटात देशात ६६ व्या क्रमांकावर आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, सचिव प्राचार्य अनिरूद्ध जाधव, सहसचिव गोपाळ शिंदे, सहसचिव सुनिल सोनवणे व इतर सर्व संचालक, सीईटी-सेल शालेय समिती अध्यक्ष डॉ. सुहास गोरे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, एसटीएनएमएसचे संचालक बी. ए. मैंदर्गी, सीईटी-सेलचे संचालक प्रा. दिलीप देशमुख, एसटीएनएमएसच्या प्राचार्या सौ. विना कोपकर व सीईटी-सेलचे सर्व समन्वयक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# तोंडारपाटी येथील शासकीय निवासी शाळेमधील रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु

लातूर, / प्रतिनिधी: उदगीर तालुक्यातील तोंडारपाटी येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेमध्ये सेमी इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता सहावी ते इयत्ता दहावीमध्ये रिक्त जागेसाठी नाव नोंदणी सुरु करण्यात आली आहे.

सामाजिक न्याय व विषेश सहाय्य विभागाच्या तोंडारपाटी येथील शासकीय निवासी शाळेत इयत्ता सहावी ते इयत्ता दहावीपर्यंत रिक्त जागांवर प्रवेश उपलब्ध आहेत. यामध्ये अनुसूचित जातीसाठी ८० टक्के, अनुसूचित जमातीसाठी १० टक्के, विमुक्त जाती व जमाती ५ टक्के, दिव्यांग प्रवर्गासाठी ३ टक्के आणि विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के जागा राखीव आहेत. आयएसओ नामांकन मिळवणारी ही लातूर सामाजिक न्याय विभाग अंतर्गत दुसरी शाळा आहे. तसेच या शाळेत महाराष्ट्र शासन व कला संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या एलिमेंटरी व इंटरमिडीयट परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यात येते.

प्रवेशित विद्यार्थ्यांना शाळेमध्ये एक वेळ नाश्ता, दूध, अंडी, केळी, सफरचंद इत्यादी दिले जाते. तसेच दोन वेळा पोटभर व रुचकर जेवण देण्यात येते. तसेच २ गणवेश, आवश्यक शैक्षणिक साहित्य, दैनंदिन वापरवायचे साहित्य (साबण, सोडा, तेल, पेस्ट, ब्रश इ.) देण्यात येते. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र कॉट, गादी, उशी, बेडशीट, कंबल व पेटी देण्यात येते. निवासी शाळेमध्ये दोन हजारपेक्षा जास्त संदर्भ पुस्तकांचे ग्रंथालय, ई-लायब्ररी, तसेच दररोज वृत्तपत्रे वाचनासाठी दिली जातात.

शासकीय निवासी शाळेत अत्याधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल वर्गाखोल्या, संगणक प्रयोगशाळा पिण्यासाठी आरओ पाणी, २४ तास सुरक्षा रक्षक, २४ तास वीज पुरवठा व्यवस्था, इनडोअर सुसज्जा जीम, आऊटडोअर जीम, अनुभवी व तज्ज्ञ शिक्षक उपलब्ध आहेत. तरी इच्छुकांनी या शाळेत प्रवेशासाठी ३० जून २०२४ पर्यंत नोंदणी करून प्रवेश घ्यावेत, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त एस. एन. चिकुर्ते यांनी केले आहे.

## विनायक कांबळे यांचे निधन

लातूर, दि. ६ - औसा तालुक्यातील मातोळा येथील रहिवासी व सध्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथील भूमी अभिलेख कार्यालयाचे तालुका निरीक्षक विनायक तुकाराम कांबळे यांचे गुरुवारी (दि. ६) सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सायंकाळी ६ वाजता खाडगाव रोडवरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पत्नी, मुलगा, तीन मुली, जावई, नातू असा परिवार आहे.

# लातूर जिल्ह्यात विशेष अतिसार नियंत्रण पंधरवड्यास प्रारंभ

लातूर, / प्रतिनिधी: राज्यातील अर्भक मृत्यू दर व बाल मृत्यूदर कमी करणे हे राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. देशातील ५ वर्षापर्यंतच्या बालकांच्या मृत्यूमागे अतिसार हे प्रमुख कारण आहे. सुमारे ५.८ टक्के बालके अतिसारामुळे दगावतात. बाल मृत्यूचे प्रमाण उन्हाळ्यात व पावसाळ्यात जास्त असते. यामुळे सन २०१४ ते २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या अतिसार नियंत्रण पंधरवाड्याच्या यशस्वीतेनंतर यावर्षी अतिसरामुळे होणारे बालमृत्यू शुन्य करणे हे उद्दिष्ट ठेवून जिल्ह्यात ६ जून ते २१ जून, २०२४ या कालावधीत विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा राबविण्यात येत आहे.

या पंधरवाड्याचे उद्दिष्ट हे अतिसार असलेल्या सर्व मुलांना ओआरएस व झिंकचे वाटप करणे, पाच वर्षाखालील मुलांच्या अतिसार प्रतिबंध आणि व्यवस्थापनासाठी पालकांचे समुपदेशन करणे व अतिजोखमीचे क्षेत्र आणि दुर्बल घटकांवर विशेष लक्ष केंद्रीत करणे आहे. यासाठी पंधरवडा कालावधीत जनजागृती, अतिसरामध्ये घ्यावयाची काळजी, तसेच क्षारसंजीवनी (ओआरएस) व झिंक गोळ्या यांचा वापर कसा करावा? याबाबत अशा स्वयंसेविकांमार्फत प्रात्यिक्षिके करुन दाखविण्यात येणार आहेत.

ज्या घरात ५ वर्षापर्यंतच्या बालकांना अतिसार असेल अशास बालकांना ओआरएसचे दोन पाकीटे देण्यात येणार आहेत व झिंक गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील १ लाख ८५ हजार २७८ व शहरी भागातील १५ हजार ७४७ अशा एकूण २ लाख १ हजार २५ बालकांचा समावेश आहे. या मोहिमेत आशा स्वयंसेविका यांच्यामार्फत गावात प्रत्येक घरोघरी पालकांना एकत्रीत करुन ओ. आर.एस. द्रावण तयार करुन दाखविले जाणार आहे. तसेच स्वच्छतेचे महत्व पटवून हात धुण्याचे प्रात्यक्षिकही करुन दाखविले जाणार आहे. तसेच सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्य संस्थेत ओर.आर.टी. कॉर्नर स्थापन करण्यात येणार आहे.

६ जून ते २१ जून, २०२४ या कालावधीत विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा या मोहिमेतंर्गत सर्व पालकांनी ५ वर्षापर्यंच्या बालकांमध्ये होणारे अतिसाराचे प्रतिबंध व उपाययोजना याबाबत माहिती करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच.व्ही. वडगावे व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. ढेले पी. एम. यांनी केले आहे.



**संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालय अहमदपूर येथे शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक आशा रोडगे,सविता पाटील, संजीवनी गुरमे, बब्रुवान कलाले, प्रल्हाद वाडकर सह पालक विद्यार्थी उपस्थित होते.**

# शिवराज्याभिषेकामुळेच स्वराज्याला सार्वभौमत्व प्राप्त झाले: डॉ. संतोष पाटील

अहमदपूर दि. ०६ (प्रतिनिधी)- छत्रपती शिवाजी महाराजांच्या संघटनात्मक कार्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक मूल्ये खोलवर रुजली गेली. स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी महाराजांनी राज्याभिषेक करून घेतला. शिवराज्याभिषेकामुळे स्वराज्याला सार्वभौमत्व प्राप्त झाले, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. संतोष पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले महाविद्यालयात महाराष्ट्रातील ख्यातनाम लेखक, समीक्षक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या म शिवस्वराज्य दिन म कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संतोष पाटील बोलत होते. या प्रसंगी विशेष उपस्थितीमध्ये राणीसावरगाव येथील प्रा. दुल्हेखान पठाण हे होते. पुढे




बोलताना ते म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात सर्व जाती धर्माच्या लोकांना समान पातळीवर आणले. सर्व प्रकारचा भेदभाव नष्ट केला. म्हणून आजही जगात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला एक आदर्श राज्य म्हणून ओळखले जाते, असेही ते यावेळी म्हणाले.

शिव- फुले- शाहू- आंबेडकर असा निनाद व्हावा अध्यक्षीय समारोप करताना सुप्रसिद्ध लेखक समीक्षक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी चटणी भाकरी खाऊन सोबत राहणा-या मावळ्यांना तसेच अठरा पगड जातींना सोबत घेऊन वाटचाल करणा-या नेतृत्वाचा हा स्वराज्याभिषेक सोहळा अहल्याचे नमूद करून रायगडाचे बांधकाम हिंदोजी इंदूलकर यांनी केले असल्याचे म्हटले. छत्रपतींनी स्वाभिमान आणि पुरोगामी विचार देत वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासला. म्हणून आता तरी म शिव- फुले- शाहू- आंबेडकरफ्असा निनाद व्हावा, असे म्हणून सध्याच्या राज्यकर्त्यांनी नव भारताच्या उभारणीसाठी शिवछत्रपतींच्या स्वराज्यातील ध्येय धोरणे अवलंबली पाहिजेत असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश ससाणे यांनी केले. तर आभार प्रदर्शन ह.भ.प. डॉ. अनिल महाराज मुंढे यांनी केले. यावेळी डॉ. प्रशांत बिरादार, डॉ.पी.पी.चौकटे, डॉ. किरण गुट्टे, प्रशांत डोंगळीकर, अजय मुरमुरे, चंद्रकांत धुमाळे, वामन मलकापुरे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

यशवंत धाराशिव जिल्हा

शुक्रवार दि. ०७ जून २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## उपळा येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – तालुक्यातील प्रा केंद्र येडशी अंतर्गत उपकेंद्र उपळा येथे जागतिक पर्यावरण दिन वृक्षारोपण करून दि.५ जून रोजी साजरा करण्यात आला.धाराशिव तालुक्यातील उपळा उपकेंद्राचे सामुदाय अधिकारी डॉ प्रियंका जाधव व प्रा.आ. केंद्राचे आरोग्य सहाय्यक सुरेश गंगावणे यांच्या व उपकेंद्रात ० ते ५ वयोगटातील मुलांचे लसीकरणसाठी आलेल्या लाभार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी आशा सुपरवायझर पवार, आरोग्य सेविका शितल पारगावकर, आरोग्य सेवक राहुल पतंगे व आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या. तसेच प्रा आ केंद्र अंतर्गत येणाऱ्या सर्व उपकेंद्र व परिसरात जास्तीत जास्त वृक्षारोपण करण्यात येईल असे सुरेश गंगावणे यांनी सांगितले.

# निम्न तेरणाच्या विशेष दुरुस्तीचा ११३.५३३ कोटींचा प्रस्ताव

## प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर – आ. पाटील

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – मागील १२ वर्षांपासून बंद असलेल्या निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्तीचा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. तो उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने या योजनेच्या विशेष दुरुस्तीचा ११३.५३३ कोटी रुपये अंदाज पत्रकीय किमतीचा प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडून दि.३ जून रोजी प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आला असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

आ. पाटील यांनी उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना भेटून ही महत्त्वाची योजना कार्यान्वित करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. त्यानुसार जलसंपदा विभागाच्या अपर मुख्य सचिवांना कार्यवाही करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले होते. या अनुषंगाने विविध विभागांची आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करून प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी आता शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

धाराशिव, लोहारा व औसा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांसाठी ही योजना अत्यंत महत्वपूर्ण आहे. मागील अनेक वर्षांपासून देखभाल दुरुस्ती अभावी बंद असलेली ही योजना कार्यान्वित करण्यासाठी स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी या तिन्ही विभागांची संबंधित दुरुस्ती आवश्यक होती. या योजनेचे आशिव, कानेगाव, करजखेडा, वडाळा, बामणी असे ५ टप्पे असून यामुळे ६ हजार ८९० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. यातील ५ हजार ७०० क्षेत्र केवळ धाराशिव तालुक्यातील असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच ही योजना कार्यान्वित करण्यासाठी योजेनची संपूर्ण पाहणी करून स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी संबंधित दुरुस्तीचे अंदाज पत्रक तयार करून विशेष दुरस्तीचा प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांच्या मंजुरीने राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आला होता. त्या समितीने दि. ११ जानेवारी २०२४ रोजीच्या बैठकीमध्ये या प्रस्तावास मंजूरी दिली होती. त्यानंतर उपस्थित त्रुटींची पूर्तता करत आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण करून अंतिम मान्यतेसाठी हा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. शासनाची मंजूरी व निधीची तरतूद करून घेण्यासाठी पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे आ. पाटील यांनी सांगितले आहे.



## पालकमंत्री डॉ.सावंत यांच्या मतदार संघात खा. राजेनिंबाळकर यांना ८१ हजार मतांची लिड



परंडा दि.६ (प्रतिनिधी) – लोकसभेच्या मत मोजणीमध्ये पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत याच्या परंडा मतदार संघात ८१ हजार मतांची विक्रमी लिड खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना मिळालेली आहे. परंडा शहराने खा. राजेनिंबाळकर यांना ३१२८ मतांची लिड दिली. तसेच पालकमंत्री सावंत भाजपचे आमदार माजी मंत्री राणाजगजितसिंह पाटील, आमदार ज्ञानराज चौगुले, शिक्षक आमदार विक्रम काळे, पदवीधर आमदार सतिश चव्हाण तसेच बार्शीचे भाजप पुरस्कृत आमदार व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासु राजेंद्र राऊत, औसाचे भाजपाचे आमदार उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे खाजगी सचिव अभिमन्यु पवार एवढी मोठी सत्तेतली टिम असताना खा राजेनिंबाळकर यांनी त्यांना धुळ चारून तब्बल ३ लाख ३० हजार



१४३ विकमी मतांनी लिड देवून न भुतो न भविष्यती असा रेकॉर्ड ब्रेक विजय मिळवून महाराट्रात क्रमांक १ विक्रमी मतांची लिड घेवून विजयी झाले. यामध्ये परंडा शहरात १६ मनदान केंद्रावर खा राजेनिंबाळकर यांना लिड मिळालेली आहे.

## विहिरीवरील मोटार का चालू केली म्हणून महिलेला मारहाण

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – विहिरीवरील मोटार मला न विचारता का चालू केली म्हणून ७० वर्षीय महिलेसह भांडण सोडविण्यासाठी आलेल्या मुलाला लाथा बुक्क्या, दांड्याने जबर मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना कळंब तालुक्यात घडली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, कळंब तालुक्यातील पाथर्डी येथील दिनेश नारायण काकडे, स्वाती दिनेश काकडे, प्रदिप दिनेश काकडे व संदीप दिनेश काकडे यांनी दि. ४ जून रोजी ८ वाजण्याच्या सुमारास पाथर्डी येथे आयोध्या नारायण काकडे (वय ७० वर्षे) यांना नमुद आरोपींनी मोटर चालु केलती का, ते मला का विचारले नाही ? या कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, दगडाने मारहाण करुन जखमी केले. तर फिर्यादीचा मुलगा भारत काकडे हा भांडण सोडवण्यास आला असता नमुद आरोपींनी त्यासही शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी आयोध्या काकडे यांनी दि. ४ जून रोजी दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात भा.द.वि.सं. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## जिल्हा परिषदेच्यावतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – जिल्हा परिषद परिसरात मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांच्या हस्ते दि.५ जून रोजी वृक्षारोपन करण्यात आले. पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरुकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्राचे हे प्रमुख साधन आहे. जमिन पुर्नसंचयित करणे, वाळवंटीकरण आणि दुष्काळ प्रतिरोधकता ही जागतिक पर्यावरण दिन २०२४ ची थीम आहे. वातावरणीय बदल व जागतिक तापमान वाढ रोखण्यासाठी जिल्हयातील प्रत्येक नागरीकाने सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी या पावसाळयात किमान दोन झाडे लावावीत व त्या झाडांचे संगोपन करावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ घोष यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन कृषि विभागाने केले होते. यावेळी प्रमोद राठोड, कृषि विकास अधिकारी नागेश पाटील, जिल्हा कृषि अधिकारी व कृषि विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना मुस्लिम मतदारांनी स्विकारले

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभेचे दुसऱ्यांदा खासदारकीची माळ गळ्यात पडलेले लोकप्रिय खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना मुस्लिम मतदारांनी भरभरून मतदान केले असून शिवसेनेला स्वीकारले असल्याचे काल झालेल्या मत मोजणी व निकालावरुन दिसून येत आहे. विशेष म्हणजे २०१९ पर्यंत मुस्लिम मतदार हा शिवसेनेचा कट्टर विरोधात होता. मात्र भाजपची साथ सोडून शिवसेनेने सामन्याची भूमिका घेतल्याने मुस्लिमांच्या विरोधी मताचे रूपांतर निवडून आणण्याच्या एकगठ्ठा व निर्णायक ठरले आहे.

लोकसभेची निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी लोकशाही पोषक व संविधान मानणाऱ्या कॉँग्रेस राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाशी युती करीत आपली प्रचाराची स्पष्ट भूमिका राज्यभरात मांडली. या प्रचारा दरम्यान कुठेही हिंदू मुस्लिम द्वेष किंवा दरी निर्माण होईल अशी भूमिका मांडली नाही. विशेष म्हणजे हिंदुत्व या मुद्द्यावरून भाजपचे हिंदुत्व हे शेंडी, जाणवेधारी व जाती जातीत द्वेष पसरविणारे आहे. तर शिवसेनेचे हिंदुत्व हे हृदयात राम व हाताला काम देणारे आहे. हे वारंवार ठाकरे यांनी प्रचार सभे दरम्यान ठिकठिकाणी ठणकावून सांगितले. तर धाराशिव येथील सभेची अनेक मुस्लिम बांधवांनी शिवसेनेला पाठिंबा तर दर्शविलाच. त्याबरोबरच प्रचार दरम्यान मशालीलाच मतदान करण्याचे आवाहन

### सौम्य व मवाळ भूमिका पडली पथ्यावर

मुस्लिम बांधवांना केले. त्यातच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कॉँग्रेस म्हणजेच इंडिया आघाडी सरकार सत्तेवर आली तर त्यांना मागासवर्गीय समाजाचे आरक्षण देईल असा जातीमध्ये तेढ निर्माण करणारा प्रचार केला. तसेच माहिती मधील घटक पक्ष असलेले शिंदे सेनेचे माजी खासदार रवींद्र गायकवाड यांनी मतदानाच्या दोन दिवस अगोदर मुस्लिम मौलवी व समाजाबद्दल आपला आकाश व्यक्त करून महायुतीतील सर्वच घटक पक्ष मुस्लिम विरोधी असल्याचे



दाखवून दिले होते. त्यामुळे याचे प्रत्युत्तर मुस्लिम समाजाने सनदशीर मार्गाने मतदानाच्या माध्यमातून एकगठ्ठा मतदान खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या विजयामध्ये मोठे योगदान दिले आहे.

## फ्लाईंग किड्स स्कूलचा १०० टक्के निकाल



धाराशिव दि.५ (प्रतिनिधी) – येथील फ्लाईंग किड्स इंटरनेशनल इंग्लिश स्कूलचा सी.बी.एस.ई. बोर्ड १० परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. या यशाच्या पायाभरणीत वर्गशिक्षक मल्ल, पांडे, बडवे, मोरे, प्राचार्य चतुर्वेदी, उपप्राचार्य जेकब आदींनी परिश्रम घेतले. याबद्दल आ.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, सरचिटणीस प्रेमाताई पाटील, प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील, विद्यालयाच्या संचालिका डॉ. मंजुळा पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## तेरणा महाविद्यालयात जमीन पुनर्संचयित कार्यक्रमाचे आयोजन




धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात मेरी लाईफ या उपक्रमा अंतर्गत आमची जमीन, आमचे भविष्य. आम्ही जनरेशन पुनर्संचयित आहोत या थीम अंतर्गत यावर्षी विद्यार्थ्यांनी जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण व दुष्काळातील लवचिकता यावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन दि.५ जून रोजी करण्यात आले होते. मेरी लाईफ या उपक्रमा अंतर्गत प्रत्येक महाविद्यालय आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण पूरक वातावरण निर्मिती करण्यासाठी जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. यावेळी तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरामधील प्लास्टिक गोळा करून प्लास्टिक मुक्त वातावरण संदेश देण्याचा प्रयत्न केला. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की, महाविद्यालयांमध्ये परीक्षेच्या माध्यमातून अनेक पेपरचा उपयोग केला जातो. परंतू भविष्यामध्ये डिजिटल परीक्षा घेण्यावर भर देण्यात येणार असल्यामुळे पेपरलेस सोसायटीकडे आपली वाटचाल सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तर वेगवेगळ्या ठिकाणी होणारी अन्नाची नासाडी, अन्न कचरा नियोजम व अनेक जैविक साधनसंपत्तीची नासाडी होत असून विद्यार्थ्यांमध्ये आत्तापासूनच जनजागृतीची आवश्यकता असल्यामुळे आम्ही या निमित्ताने अनेक समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांने, कर्मचाऱ्यांनी आपल्या महाविद्यालयामध्ये व आपल्या परिसरामध्ये किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन व संवर्धन करावे असेही आवाहन त्यांनी केले. यावेळी समिती प्रमुख डॉ.एस.एन. होळंबे, प्रा. अभिजीत कदम, धनाजी जाधव, अभिमन्यू धोत्रे, सोमनाथ कोरके, हनुमंत सुरवसे, सुरज खराडे, नितीन राठोड व सारंग चाऊते आदींसह विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## वारकऱ्यांना टाळ, मृदुंग, विना व पेटीचे साहित्याचे वाटप



धाराशिव दि. ६ (प्रतिनिधी) – तुळजापूर तालुक्यातील विविध गावांतील वारकऱ्यांना वारकरी साहित्य परिषदेच्यावतीने टाळ, मृदुंग, विना व पेटीचे वाटप करण्यात आले.

वारकरी साहित्य परिषद धाराशिव व तुळजापूर शाखेच्यावतीने वारकऱ्यांना हभप मोहन वाघुलकर, हभप संदिपान महाराज हासेगावकर व हभप चौरे महाराज यांच्या हस्ते टाळ, मृदंग, वीणा व पेटी या साहित्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी शोभाताई लंगडे, दिलिप सावंत महाराज, सुनील ढगे महाराज, बाबुराव पाटील, बाबुराव पुजारी, पिंटू देशमुख, नंदू पवार, ॲड बालाजी पाटील, पिंटू भक्ते, व्यंकट नाईकवाडे, सौदागर लोंखडे, मधुकर शिंगाडे, संतोषी निंबाळकर, करंजकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमास बेंबळी, वडाळा, कौंडगाव, सोनेगाव ताकविकी, वाडी, रुईभर, किणी, विठ्ठलवाडी, कदमाची टाकळी, मुकबधीर शाळा आंबेवाडी, अणदूर, काटी, खुंटेवाडी, दहीवडी आदी गावांतील वारकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री शिंदे यांनी तात्काळ राजीनामा द्यावा – ॲड. भोसले

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महाराष्ट्रात शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी कामगार, महिला, बेरोजगार तरुण, अल्पसंख्यांक, कायदा व सुव्यवस्था आदी प्रश्न सोडवण्यात पूर्णपणे अपयशी ठरले. त्यामुळेच भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी कॉँग्रेसला लोकसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री शिंदे यांनी तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी समाजवादी पार्टीचे प्रदेश महासचिव तथा प्रवक्ते ॲड रेवण भोसले यांनी केली आहे.

राज्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळामुळे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे. तर पाणी टंचाईमुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. जनावरांसाठी पाणी व चाऱ्याची कमतरता



निर्माण झाली आहे. तसेच पावसामुळे अनेक ठिकाणी प्रचंड नुकसान झाले असतानाही त्यास नुकसान भरपाई अद्यापपर्यंत न देता फक्त थापा मारण्यातच मुख्यमंत्री दिवस काढत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तर मराठवाडा प्रचंड दुष्काळाने होरपळत आहे, यासह अनेक प्रश्न सोडवण्यास मुख्यमंत्र्यांना अपयश आले आहे. त्यामुळे तात्काळ मुख्यमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्यात अशी मागणी ॲड भोसले यांनी केली आहे.

यशवंत धाराशिव जिल्हा
शुक्रवार दि. ०७ जून २०२४
४
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# नळदुर्ग येथील वसतीगृह प्रवेशासाठी अर्ज करावेत

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृहात नवीन प्रवेश करण्यासाठी प्रवेश अर्ज वाटप सुरु आहे.

शालेय विद्यार्थी, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय व व्यावसायीक महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेशासाठी अर्ज वाटप सुरु आहे. गरजु व गरीब विद्यार्थ्यांना राहण्याची व भोजनाची व सकाळी नाष्ट्याची तसेच सर्व सोयी सुविधा विनामुल्य आहेत. शालेय विद्यार्थ्यांना शालेय गणवेश १ हजार रुपये, छत्री, गमबुटा – ५०० रुपये शालेय स्टेशनरी प्रती महिना ५०० रुपये प्रमाणे निर्वाह भत्ता दिला जातो. महाविद्यालय विद्यार्थ्यांना २ हजार रुपये व छत्री– ५०० रुपये, स्टेशनरी– ४ हजार रुपये, निर्वाह भत्ता – ५०० रुपये रक्कम त्यांच्या बॅक खात्यावर दिली जाते. त्यामुळे गरजू विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, नळदुर्गच्या गृहपालांनी केले आहे.

# श्रीपतराव भोसले हायस्कूलचे १० विद्यार्थी नीट परीक्षेत पहिल्याच प्रयत्नामध्ये चमकले – पाटील



धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलचे १० विद्यार्थी नीट परीक्षेमध्ये चमकले आहेत. या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी राजस्थान, दिल्ली येथील तज्ज्ञ प्राध्यापक आहेत. विशेष म्हणजे धाराशिव जिल्हयातील गुणवंत विदयार्थी १० वी नंतर लातूर, औरंगाबाद, हैद्राबाद, कोटा अशा ठिकाणी जेईई (JEE) व नीट (NEET) च्या तयारीसाठी जातात. त्यासाठी त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक खर्च येतो. तो करण्यापेक्षा ज्या सुविधा त्या विद्यार्थ्यांना इतर जिल्ह्यांमध्ये मिळतात, त्या सुविधा या हायस्कूलमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तर आज लागलेल्या वैद्यकीय पूर्व परीक्षा (NEET) मध्ये पहिल्याच प्रयत्नामध्ये १० विद्यार्थ्यांना घवघवीत यश मिळाले आहे. या विद्यार्थ्यांमध्ये ९ विद्यार्थिनींचा समावेश आहे. त्यामुळे पालकांनी या शैक्षणिक सोयीसुविधाचा लाभ आपल्या अकरावी व बारावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावा असे आवाहन आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी दि. ६ जून केले.

धाराशिव येथील श्रीपतराव भोसले उच्च माध्यमिक विदयालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्था सचिव प्रेमा पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील, संस्थेचे सदस्य तथा गुरुवर्य के. टी. पाटील फाउंडेशन प्रमुख यु.व्ही. राजे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी एस. एस. देशमुख, प्राचार्य एन.आर. नन्नवरे, उपप्राचार्य एस.के. घार्गे, फोटॉन बॅच प्रमुख प्रा ए व्ही भगत, भौतिकशास्त्र प्रमुख प्रा बिमलेस कटियार, रसायनशास्त्र प्रमुख प्रा राजेश कुमार, वनस्पतीशास्त्र प्रमुख प्रा अमित सिंग, प्राणीशास्त्र प्रमुख प्रा दानिश खान, गणित प्रमुख प्रा संजय मिश्रा आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना पाटील म्हणाले की, वैद्यकीय पूर्व परीक्षेत (NEET) हुंबे वैष्णवी दादासाहेब ६५१, घाडगे रिया रामचंद्र ५४१, माळी रचना निवृत्ती ५८५, पठाण आफिया अकबर अली ५७८, साळुंके सृष्टी सुनील ५७३, सोनटक्के प्रताप काकासाहेब ५६७, साळुंके रुतुजा ५०४, देटे शिवराज बाप्पासाहेब ४८४, दिरगुले प्रथमेश सिताराम ४७९, घारगे अथर्व संतोष ४७६, पाटील रुषिकेश केशव ४७२, उंडे मेघा बापुसाहेब ४६९ या विद्यार्थ्यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच धाराशिव जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थी १० वी नंतर बाहेरच्या ठिकाणी जेईई (JEE) व नीट (NEET) च्या तयारीसाठी जातात. यामुळे पालकांना आर्थिक नुकसान होते. पालकांचे आर्थिक नुकसान होऊ नये व विद्यार्थ्यांना घरच्या वातावरणात तयारीसाठी जास्तीचा वेळ मिळावा, त्यांना योग्य अशा तज्ज्ञ प्राध्यापकांकडून माफक फीसमध्ये मार्गदर्शन मिळावे हे उद्दिष्ट समोर ठेवून आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाने नीट (NEET), जेईई (JEE) परीक्षेसाठी श्रीपतराव भोसले उच्च माध्यमिक विदयालय येथे फोटॉन (झर्हेीप इरीलह) व चक्ळ–उएढ साठी फेनॉमेनॉल (Phenomenal Batches) सुरू करण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले. या बॅचेसला शिकविण्यासाठी दिल्ली, कोटा येथील अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक नेमण्यात आलेले आहेत. तसेच विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिकेची सोय उपलब्ध केली असून विद्यार्थिनींना संध्याकाळी वाहनाने घरपोच करण्याची सुविधा उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. तर फोटॉन व फेनॉमेनॉल बॅचची वैशिष्ट्य पहायची झाली तर त्यामध्ये दिल्ली, कोटा येथील अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक, दर्जेदार मल्टीकलर प्रिंटेड स्टडी मटेरियल, सुसज्य ग्रंथालय व अभ्यासिका, बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी, चाप्टर वाईज ऑफलाईन परीक्षा घेणे व एसएमएसद्वारे पालकांना सराव परीक्षेचे गुण पाठवणे,

डेली प्रॅक्टिस प्रोग्रामच्या माध्यमातून पालकांना निकाल देणे, दररोज डाऊट सॉल्विंग सत्र घेणे, अभ्यासपूर्ण नियोजन व दर १५ दिवसाला परीक्षा, मुलभूत व क्लिष्ट घटकांचे प्रोजेक्टरद्वारे सुस्पष्टीकरण, सुपर ३० नाईट स्टडी रूम चालवणे, नीट (छएएढ), जेईई (JEE) बॅचमध्ये स्मार्ट डिजिटल बोर्डद्वारे शिक्षण, संपूर्ण कॅम्पस व वर्ग खोल्या कॅमेरा अंतर्गत असणे, दत्तक योजनेद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तीक लक्ष, नीट (NEET), जेईई (JEE) परीक्षेनंतर पुढील प्रवेशासाठी मार्गदर्शन इत्यादी घटकांचा अंतर्भाव असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी गुणवंत व यशवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या पत्रकार व प्राध्यापक यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन, पेढे भरवून व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या विद्यार्थी, पालक, संस्थेचे पदाधिकारी, सर्व प्राध्यापक, विषय प्रमुख, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# गुलाबी बोंडअळीचे व्यवस्थापन कृषी विभागाने सुचविल्या उपाययोजना

धाराशिव दि.०६ (प्रतिनिधी) – शेतकरी, व्यापारी तसेच जिनिंग मिलमधे प्रक्रिया न करता कापुस साठवला जातो.या साठवलेल्या कापसामध्ये किडीचा जीवनक्रम अखंडीत सुरु राहुन किडीच्या प्रादुर्भावाची संभाव्यता वाढते.तरी सदर ठिकाणी प्रकाश सापळे व गुलाबी बोंडअळीसाठीचे कामगंध सापळे लावुन त्यामध्ये अडकलेले पतंग तसेच सरकीतील अळ्या व कोष नष्ट करावेत.कापसापासुन निर्माण झालेला कचरा नष्ट करुन परिसर स्वच्छ ठेवावा.

कापुस पिकाचे फरदड घेऊ नये.काही ठिकाणी शेतात उभ्या असलेल्या कापुस पिकामध्ये शेळ्या,मेंढ्या व इतर जनावरे चरण्यासाठी सोडावीत. प–हाट्यांचे लहान लहान तुकडे करुन ते शेतात गाडावेत किंवा त्याचा वापर शेताबाहेर कंपोस्ट तयार करण्यासाठी करावा.

कापुस पिकाची पुर्वहंगामी लागवड टाळावी.संकरीत वाणांची लागवड न करता गावनिहाय एकाच वाणाची व एकाच वेळी लागवड करावी. शिफारस केलेल्या कमी कालावधीत पक्व होणा–या बीटी कापुस अथवा सरळ वाणांची वेळेतच म्हणजे जुन महिन्यात जमीनीत पुरेसा ओलावा आल्यानंतर पेरणी करावी.किडीच्या जीवनक्रमात अडथळा निर्माण करण्यासाठी पिकांची फेरपालट करावी. कपाशीच्या सभोवती नॉन बीटी (रेफ्युजी) कपाशीची लागवड करावी.नत्र खताचा वापर जास्त झाल्यास पिकाची कायिक वाढ होऊन गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव वाढतो म्हणुन जास्तीच्या नत्र खताचा वापर न करता मृदा परिक्षण करुन त्याच्या आधारावर खतांच्या मात्रेचा अवलंब करावा.

कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी वरील उपाययोजना कराव्यात. जेणेकरुन पुढील हंगामात खरीपमध्ये गुलाबी बोंडअळीचा होणारा प्रादुर्भाव टाळता येऊ शकेल, असे आवाहन वाशी तालुका कृषि अधिकारी आर.डी. बर्वे यांनी केले आहे.

# डॉ. आंबेडकर कारखान्याच्यावतीने मयत सभासदाच्या वारसास एक लाख विमा रकमेचे वाटप



धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – तालुक्यातील केशेगाव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या सभासद असलेल्या शेतकऱ्याचा मृत्यू झाला. त्याच्या नातेवाईकाला एक लाख रुपयांची विमा रकमेचा धनादेश देण्यात आला.

धाराशिव तालुक्यातील महाळंगी येथील शेतकरी हरिश्चंद्र उत्तम जाधव हे डॉ बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याचे सभासद होते. ते मयत झाले. त्यांचा विमा कारखान्याच्यावतीने उतरविण्यात आला होता. त्यामुळे १ लाख रुपये विमा रकमेच्या धनादेशाचे वाटप यांचे वारस मंजू हरिश्चंद्र जाधव यांना कारखान्याचे संचालक कुंद पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी महादेव ढवळे, लक्ष्मण ढवळे, अजित शेख, धनराज गुंड यांच्यासह केशेगाव सर्कलचे गायकवाड, कर्मचारी पी.एस. जाधव, एस.एन. कोळगे आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा गरजूंनी लाभ घ्यावा

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम हा राज्य शासनाचा महत्वकांक्षी कार्यक्रम आहे.या योजनेतून सुशिक्षित बेरोजगारांना उद्योग व्यवसायासाठी महाराष्ट्र शासनातर्फे अर्थसहाय्य करण्यात येते. उत्पादन उद्योगासाठी ५० लाख व सेवा उद्योगासाठी २० लाखापर्यंत कर्ज मर्यादा आहे.या योजनेअंतर्गत पुरुषांसाठी १५ टक्के ते २५ टक्केपर्यंत व महिलांसाठी २५ टक्के ते ३५ टक्केपर्यंत अनुदानाची मर्यादा आहे.

सन २०२४–२५ साठी जिल्हा उद्योग केंद्रास ८०० कर्ज प्रस्तावांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.तरी इच्छूक उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी https://maha-cmegp.gov.in/ या संकेतस्थळास भेट द्यावी. जिल्ह्यातील सर्व गरजू व्यक्तींनी या योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्र, धाराशिव येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापकांनी केले आहे.

# नियमबाह्य आंदोलन करणाऱ्या महसूल कर्मचाऱ्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी




धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – उपविभागीय अधिकारी (प्रांत), तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी जे अचानक काम बंद आंदोलनाचा बंड फुकारला आहे. तो तात्काळ बंद करुन पुर्वीप्रमाणे कामकाज नियमीत चालू करावे. तसेच हे आंदोलन नियमबाह्य असल्यामुळे त्यांच्यावर तात्काळ गुन्हे नोंदवून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जनहित शेतकरी संघटनेच्यावतीने दि.६ जून रोजी एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, दि.२८ मे पासून धाराशिव येथील उपविभागीय अधिकारी (प्रांत), तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी जे अचानक काम बंद केलेल्या आंदोलनामुळे धाराशिव तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना नाहक त्रासास सामोरे जावे लागत आहे. तर निराधार, वयोवृध्द लोकांना देखील के.वाय.सी. करण्यासाठी त्रास होत आहे. तसेच विद्यार्थ्यांना शालेय प्रवेश घेण्यासाठी अनेक प्रमाणपत्रांची आवश्यकता भासते. ते प्रमाणपत्र मिळण्यासाठी आंदोलन असल्यामुळे विलंब झाल्याने अनेक विद्यार्थ्यांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. प्रांत खरमाटे तसेच इतर अधिकारी यांच्यावरती गुन्हे दाखल होऊन सुध्दा अद्यापर्यंत खरमाटे यांना ताब्यात घेतलेले नाही. याचा अर्थ पोलीस व महसुल विभाग यांचे संगणमत चालु असल्याचे सिध्द होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सध्याच्या काम बंद आंदोलनाची पोलीस विभागाला सूचना दिलेली नव्हती. तर आचार संहिता चालु असताना या अधिकारी – कर्मचाऱ्यांनी आंदोलन चालु केल्यामुळे त्यांच्यावरती कलम १४४ चे उल्लंघन केल्या प्रकरणी कार्यवाही करण्यात यावी. विशेष म्हणजे काम बंद आंदोलन चालु असताना त्यांनी शासकीय वाहनांचा वापर केलेला आहे. तसेच आजपर्यंतच्या दिवसांची पगार कपात करण्यात येऊन त्याची सेवा पुस्तिकेमध्ये नोंद घ्यावी. असे न केल्यास आमचे कधीही व कोणत्याही स्वरुपात भरुन येणारे नाही. तर विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. यापूर्वी आम्ही काम चालु करण्यासाठी संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना लेखी स्वरुपात सुचना, अर्ज दिलेले आहेत. त्यामुळे उपविभागीय अधिकारी (प्रांत), तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी चालु केलेले आंदोलन तात्काळ बंद करण्यात येऊन पुर्वीप्रमाणे कामकाज नियमीत चालु करण्यात यावे. अन्यथा दि.७ जून रोजी उपविभागीय अधिकारी (प्रांत) तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांनी अचानक चालु केलेले काम बंद चे आंदोलन बंद करण्यात यावे असे न केल्यास हजारो शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयिसमोर बेमुदत उपोषणास बसतील याची नोंद घेण्यात यावी ही विनंती. लोकशाही मार्गाने होत असलेल्या बेमुदत उपोषणामुळे होणाऱ्या परिणामाला संबंधित अधिकारी जबाबदार राहतील असा इशारा त्यांनी दिला आहे. यावर संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, अक्षय नाईकवाडी, संकेत सुर्यवंशी, अरविंद पाटील, हनुमंत सुतार यांच्या सह्या आहेत.

# डॉ. ओंबासे यांच्या हस्ते नवीन ई– पॉस मशिनचे वाटप



धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – सन २०१७ पासून सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत धान्य वाटपासाठी वापरात असलेले ई–पॉस मशिनची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांच्या हस्ते २० रास्तभाव दुकानदारांना प्राधिनिधीक स्वरुपात नवीन ई–पॉस मशिन व आयआरआयएस स्कॅनरचे वितरण दि.६ जून रोजी करण्यात आले. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे उपस्थित होत्या.

जिल्ह्यात एकूण १०७८ रास्तभाव दुकाने आहेत. जिल्ह्यातील सर्व रास्तभाव दुकानांमध्ये नविन ई–पॉस मशिन बसविण्यासाठी सिस्टम इटेग्रेटर कंपनीची निवड करण्यात आली असून त्यांच्यामार्फत रास्तभाव दुकानदारांसाठी ८ ते १३ जून– २०२४ दरम्यान तालुकानिहाय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे. नवीन ई–पॉस मशिनमध्ये आयआरआयएस स्कॅनर व फोर जी ची सुविधा दोन सीमकार्डसह देण्यात येणार आहे. तर हाताच्या बोटाचे ठसे उमटत नसतील तर ओटीपी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे यापूर्वी जुन्या ई–पॉस मशिनला नेटवर्कच्या येत असलेल्या अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सर्व योजनेच्या लाभार्थ्यांनी रास्तभाव दुकानदारांकडून धान्याची उचल करताना ई–केवायसी व मोबाईल सिडींग पुर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय–गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी–२४६९४६, मुख्य कार्यालय –५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी–२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी–(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय – दूरध्वनी – २२१४५३, उदगीर कार्यालय–(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक–**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक – **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजच्यावतीने १२ वी उत्तीर्ण गुणवंताचा सत्कार



औसा प्रतिनिधी : औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजच्यावतीने ब्ल्यू बर्ड ज्युनियर सायन्स कॉलेज, आलमला च्या इ.१२ वी उत्तीर्ण गुणवंताचा व त्यांना शिकविणा-या प्राध्यापक वृंदाचा सत्कार करण्यात आला.

या संस्थेचे सचिव श्री. बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, शिवकुमार नागराळे, जिल्हाध्यक्ष, मनसे, लातूर संचालक जयशंकर हुरदळे, विश्वनाथ बिराजदार, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, विश्वेश्वरय्या पॉलिटेक्नीकचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, ब्ल्यू बर्ड ज्युनियर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य स्वाती कापसे, डॉ. समीर शफी, डॉ. सुरज मालपाणी, डॉ. सचिन हंगरगेकर, प्रा. युवराज काटू, प्रा. किरण रोडगे आदि. उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. यास्मीन फाजल यांनी केले. डॉ. समीर शफी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनो पुढील शैक्षणिक वाटचाल करत असताना व्यवसायीक अभ्यासक्रमात करिअर करा. जसे की, डी. फार्मसी, बी.फार्मसी, फार्म-डी, इंजिनिअरींग अशा क्षेत्रात आत्मविश्वासाने स्वत:चे आयुष्य घडवा. जीवनात यशस्वी होयचे असेल तर आत्मविश्वासाशिवाय शक्य नाही. देहाचा पाठलाग करताना प्रामाणिक मेहनत, कष्ट घेतला तर यश हमखास मिळेल व ध्येयनिश्चिती होईल.

संचालक जयशंकर हुरदळे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संस्थेचे सचिव श्री. बसवराज धाराशिवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाशिवाय तुमची व तुमच्या कुटुंबाची प्रगती होणार नाही. तरी संस्थेने आलमला येथे व्यवसायीक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्याचा फायदा घेवुन स्वत:चे भविष्य उज्वल करा. असे सांगुन पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी रोहित जाधव, वैभवी कुंभार, अलिशा मुलानी, ऋतुजा बोडके, निखील सुर्यवंशी, निकीता कल्याणी, वेदांती वाघे, विशाखा कल्याणी, अभिषेक निटूरे, समिक्षा चांदुरे, साक्षी नागराळे व मार्गदर्शक शिक्षक प्रा. यास्मीन फाजल, प्रा. हबीब सय्यद, प्रा. सिमा शेख, प्रा. सचिन ससाणे, प्रा. अरबाज पठाण यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. कोमल लोहकरे यांनी केले तर आभार डॉ. कैलास कापसे यांनी केले. तसेच या कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नीट-२०२४ परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे घवघवीत यश

लातूर : दरवर्षीप्रमाणेच दयानंद विज्ञान महाविद्यालयाने नीट परीक्षेत निकालाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.चि.आर्यन गुणवंत बोराडे या विद्यार्थ्याने नीट परीक्षेत ६७५ गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्याचप्रमाणे चि. सुशांत प्रशांत काळे या विद्यार्थ्याने ६६८ गुण घेऊन महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक मिळविला आहे. चि. विकास आहेर या विद्यार्थ्याने ६६५ गुण घेऊन महाविद्यालयातून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

महाविद्यालयातून ६६८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती त्यातील ६१८ विद्यार्थी वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष तथा दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरविंदजी सोनवणे, उपाध्यक्ष ललीतभाईजी शहा, उपाध्यक्ष रमेशकुमारजी राठी, सचिव रमेशजी बियाणी, कोषाध्यक्ष संजयजी बोरा,दिनानाथजी भुतडा,सीईटी सेलचे चेअरमन डॉ. चेतनजी सारडा, दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाशजी दरगड, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. बी. ए. सरवदे, पर्यवेक्षिका व नीट समन्वयक डॉ. व्ही. सी. पाटील, पर्यवेक्षिका डॉ. एस. एस. वाडीकर, जेईई समन्वयक प्रा. रवी कुमार, सीईटी समन्वयक प्रा. कविता जाधव, नीट सह-समन्वयक प्रा. एम. टी. बाजपाई, नीट सह-समन्वयक श्री. नितेश दुधभाते, सीईटी सह-समन्वयक प्रा. कैले व्ही. ए., कार्यालयीन अधीक्षक श्री. नवनाथ भालेराव, श्री. महेंद्र कोराळे आदीसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.

# 'तुळजाभवानी'चे यश



**लातूर / प्रतिनिधी-** नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे (एनटीए) घेण्यात आलेल्या 'नीट' परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून यात येथील तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

'नीट' परीक्षेत तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाच्या गौरव गुंडाजीबापू मोरे याने ६३१ गुण, सिध्दी सागर भराडिया ५६६ व साहिल नबी शेख याने ४९७ गुण मिळवले आहेत. तसेच महाविद्यालयाच्या गौरी सचिन तिवारी, गायत्री राजेंद्र वारगड, विवेकानंद मधुकर हासुरे, श्रुती धनराज पाटील, अंजली व्यंकट मुंडे यांनीही परीक्षेत यश संपादन केले. या यशाबद्दल शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य गणपती मुंडे, राजीव मुंढे आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



# पर्यावरण दिनानिमित्त जय हिंद प्रयाग विद्यालयांमध्ये वृक्षारोपण

अहमदपूर दि.०६ (प्रतिनिधी)-अहमदपूर येथील जय हिंद प्रयाग प्राथमिक विद्यालयांमध्ये पर्यावरण दिनानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वृक्षारोपण करण्यात आले पर्यावरण दिनानिमित्त वृक्ष मित्र प्राध्यापक अनिल चवळे यांचा सत्कार मुख्याध्यापक श्री प्रशांत माने यांनी केला.

जय हिंद प्रयाग विद्यालयात दरवर्षी पर्यावरण व वृक्ष चळवळ या क्षेत्रात कार्यरत असते विद्यार्थ्यांना पर्यावरणाची माहिती व वृक्षारोपणाबद्दल प्रोत्साहित करून सर्वांना सोबत घेऊन दरवर्षी वृक्ष लागवड वृक्ष संगोपनाचे कार्य हे विद्यालय करत असते.

या वृक्षारोपणाच्या वेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत माने वृक्ष मित्र अनिल चवळे शिक्षक बांधव अभय कच्छवे ,मनोज कदम ,मिलिंद कांबळे, युवराज पाटील ,प्रशांत चोले आदी उपस्थित होते .यावेळी ५० वृक्षांची लागवड करण्यात आली.

# नीट वैद्यकीय पूर्व परीक्षेत केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयाचे घवघवीत यश

लातूर / प्रतिनिधी- लातूर नीट वैद्यकीय पूर्व परीक्षेचा निकाल दिनांक ४ जून सायंकाळी ५:३० वाजता नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) ने जाहीर केला सदरील निकालामध्ये केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून आपल्या पालकाचे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले आहे.

सविस्तर वृत्त असे की प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयाच्या १२५ विद्यार्थ्यांनी नीट ची परीक्षा दिली होती.त्यापैकी सात विद्यार्थ्यांनी ६०० पेक्षा जास्त गुण घेऊन शासकीय एमबीबीएस कॉलेजला आपला प्रवेश निश्चित केलेला आहे.सदरील निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे बनकर अखिलेश या विद्यार्थ्याने ६७५ गुण घेऊन कॉलेजमध्ये सर्वप्रथम आलेला आहे.पार्थ बाळासाहेब जाधव या विद्यार्थ्याने ६३१ गुण घेऊन महाविद्यालयातून द्वितीय आला आहे.

सायली गुंडावार व जिरगे सार्थक शंकर या विद्यार्थ्याने प्रत्येकी ६२५ गुण घेऊन तृतीय आले आहेत. तसेच श्रेया भिमाजी साळवे ६२० गुण,साक्षी संतोष देशमुख ६०१ गुण सायली जाधव ५९६ गुण व ५५० पेक्षा जास्त गुण घेणारे महाविद्यालयात एकूण आठ विद्यार्थी आहेत. सर्वात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या नीट परीक्षेमध्ये केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयातून १४ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून आपले व आपल्या पालकाचे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केलेले आहे या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्थापक सचिव प्रा.सतीश मारकोळे पाटील,उपाध्यक्ष भारत भाऊ बुकतर,प्राचार्य पूजा रमेश पाटील, फिनिक्स प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या अंजना गुजराती,वीर बाजीप्रभू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मारुती बिरादार, प्रा.शैलजां नीटुरे, प्रा,आघाव सर,प्रा.सर्वेश वाघमारे,प्रा.देशमाने मॅम, प्रा.मुंडे मॅम यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# 'राजमाता जिजामाता'च्या २२ विद्यार्थ्यांचे 'नीट'मध्ये यश



**लातूर / प्रतिनिधी-** नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे (एनटीए) घेण्यात आलेल्या 'नीट' परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून यात येथील राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाच्या २२ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

'नीट' परीक्षेत राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाच्या भूषण मिलिंद घरटे याने ६९२ गुण, विशाल राजाराम गांगड ६६५, साहिल अजय नायक ६२५, महेश माधव नागरगोजे ६११, श्रुती दयानंद बद्दे ६००, शिवम भागवत जाधवर ५८५, शिवानी सुधीर भंडारी ५७६, यश राजेश महाडिक ५७२, विद्या राजाराम गांगड ५६९, ईश्वरी धनराज कदम ५६३, प्रतिक तुकाराम जाधव ५३१, इशिता अरविंद खोत ५२७, वेदांत प्रवीण नारागुडे ५२५, क्षितीजा बळीराम चव्हाण ५२५, मानसी चंद्रकांत पाटील ५१८, हर्षदा सिध्देश्वर सूर्यवंशी ५१४, शुभांगी कालिदास सूर्यवंशी ५११, पार्थ बालाजी जगळपुरे ५१०, तनिष्क शरद पवार ५१०, श्रावणी लक्ष्मण मुंडे ५०७, प्रणव मारुती पाटील ५०० तर दीपक साहेबराव बर्डे याने ५०० गुण मिळवत यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य गणपती मुंडे, राजीव मुंढे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. एस. आर. धुमाळ, प्रा. ए. एस. खोत, प्रा. एस. एम. जाधव, प्रा. डी. ए. फंड, प्रा. व्ही. पी. पाटील, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.


## श्री देशिकेंद्र ज्युनिअर सायन्स कॉलेजचे नीट परीक्षेत घवघवीत यश

लातूर / प्रतिनिधी- दि. १७ येथील श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संलित श्री देशिकेंद्र ज्यूनिअर सायन्स कॉलेजच्या विद्याथ्यांनी नीट २०२४ मध्ये उज्वल यश संपादन केल.

७ मे २०२४ रोजी झालेल्या नीट परीक्षेत कॉलेजच्या पुढील विद्याथ्यांनी ७२० गुणांपैकी चि. केदार तुकाराम शिंदे याने ६३५ गुष्ण व पृथ्वीराज संजय मंत्र याने ५७८ गुण प्राप्त करून पश प्राप्त केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. आदिनाथ सांगवे. उपाध्यक्ष माधवराव पाटील तपम-चिचोलीकर, सचिव माधवराव पाटील- टाकळीकर, सहसचिव सुनिल मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडीगाचे तसेच तसेच संचालक श्री. राजेश्वर बुके, श्री. बस्वराज येरट, ॲड. काशिनाथ साखरे, मो. लग्रिता पांढरे, श्री. राजेश्वर पाटील, श्री. बाबुराव तरगुडे, श्री. प्रभुष्या पटणे, प्रा. गुरुलिंग धाराशिवे, डॉ. महेश हालगे, संस्था कर्मचारी, डॉ. मनोज मोठे तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# पालकांनी आपल्या मुलांना गुणवत्तेसह सामाजिक बांधिलकीचे संस्कार द्यावेत

लातूर / प्रतिनिधी- प्रत्येक आई-वडीलांनी आपल्या मुलांना शैक्षणिक गुणवत्तेसोबतच, सामाजिक जाणिव आणि बांधिलकीचे संस्कार आवश्य द्यावेत, असे प्रतिपादन पंचायत समितीचे माजी सदस्य श्री प्रकाश मिरगे यांनी केले. ते ५ जुन रोजी नाथनगर लातूर येथे, महाराष्ट्र राज्य परिट-धोबी संघटनेच्यावतीने, आयोजित करण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी, प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री प्रकाशराव सुरवसे हे होते.



यावेळी बोलताना श्री मिरगे पुढे म्हणाले की, वाढत्या स्पर्धेमध्ये अपेक्षित संधीची शास्वती धुसर होत चाललीय. वाढत्या खाजगीकरणामुळे शिक्षण हे खूपच महागडे झालेय. तर बाजारू शिकवणी वर्गांची अलिखित सक्ती शिक्षण संस्थासह, स्वतः पालक वर्गाने पण स्वीकारलेली आहे. आणि मैदाना ऐवजी मुलांच्या हाती घातक मोबाईल खेळणी आली आहे. अशा अवाजवी व्यस्ततेमुळे मुलांचे आरोग्य असक्षम बनत आहे. शिवाय विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य व व्यक्तीमत्व विकासाकडे पण दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांशी संवाद वाढवून, त्यांना सेवाकार्य आणि सामाजिक जाणिवेचे संस्कार द्यावेत. तरच कुटुंब आणि समाजामध्ये समृद्धीसह, शांतता व प्रेमभाव वाढेल असेही श्री सुरवसे म्हणाले. प्रारंभी राष्ट्र संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, सामूहिक अभिवादन करण्यात आले. चि. सर्वेस सुदाम तेलंगे या विद्यार्थ्याने दहावी बोर्ड परिक्षेत विशेष प्राविण्य प्राप्त केल्यामुळे, श्री मिरगे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन आई- वडीलासह त्याचा हृद्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणपतराव तेलंगे यांनी केले. तर विवेकानंद चिंचोले यांनी सूत्रसंचालन केले. आणि सुदाम तेलंगे यांनी आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी सविता तेलंगे, नरसिंग जाधव, चंद्रकांत तेलंगे, नरसिंग सुरवसे, सुमन तेलंगे, जालिंदर सुरवसे, मायादेवी तेलंगे, शांताराम वाघमारे, दिपाली तेलंगे, धनराज गरड, रामकुमार रायवाडीकर, सायली तेलंगे, दिपक तेलंगे व सोहम तेलंगे आदी उपस्थित होते.

# काशी पीठाच्या गुरुकुलामध्ये प्राचीन शास्त्राच्या पद्धतीचे प्रशिक्षण

वारणशी- काशी ही जगातील श्रेष्ठ विद्यानगरी. प्राचीन शास्त्रांचे अध्ययन-अध्यापन, धडे-प्रवचनांसाठी ही नगरी जगप्रसिध्द आहे. येथील अनेक गुरुकुलांपैकी श्रीकाशीपीठातील श्री जगद्गुरु विश्वाराध्य गुरुकुलाने वीरशैव मठ, पीठांसाठी गुरु, जगदुरु, विद्वानांना राज्याला देण्याबरोबर आपली अशी अनेक वैशिष्ट्ये जोपासली आहेत. देशाचे पंतप्रधान माननीय श्री नरेंद्र मोदीजींच्या उपस्थितीत या गुरुकुलाने शतमानोत्सव सोहळा पूर्ण केला आहे. आता श्रीकाशीपीठाच्या या गुरुकुलामध्ये श्रीमत् काशी जगद्गुरु तसेच श्रीशैल जगद्गुरुंच्या मार्गदर्शनाखाली हिंदी आणि संस्कृत भाषा तसेच देशाचे प्रचीन शास्त्र असणारे न्याय, व्याकरण, वेदांत, साहित्य इ. विषय हे इथेच येऊन शिकविण्यासाठी तज्ज्ञ विद्वानांची नेमणूक करण्याबरोबर प्राचीन शास्त्राच्या पध्दतीनुसार प्रशिक्षण सुरु



करण्यात येत आहे. याबरोबरच विद्यापीठांमध्ये अभ्यास-अध्यापनासाठी विहित केलेल्या पाठ्यपुस्तकांवर गुरुकुलामध्येच व्याख्यानेही सुरु केली जाणार आहेत. याद्वारे वीरशैव मठांना विद्वान उपदेशक उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

त्यामुळे इच्छुक वीरशैव धर्माचे पुत्र, उत्तराधिकारी, वटू आणि विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावेत असे आवाहन करण्यात आले आहे. अर्जदार किमान ८ वी किंवा १० वी मध्ये संस्कृत विषयासह उत्तीर्ण असावेत. किंवा कर्नाटक संस्कृत परीक्षा अथवा काव्य परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

दि. २-७-२०२४ रोजी श्री क्षेत्र येडूर, ता. चिकोडी, जि. बेळगावी येथे मुलाखत घेतली जाईल. दि. २५-६-२०२४ च्या आत इच्छुकांनी अर्ज पाठवावेत. अर्जामध्ये आपला पूर्ण पत्ता तसेच मोबाईल नंबर नमूद करावा. अर्जासोबत पूर्वीच्या शिक्षणाची प्रमाण पत्रे आणि आधार कार्ड जोडणे आवश्यक आहे. मुलाखतीस येताना सोबत तुम्ही पाठवलेल्या अर्जाची एक झेरॉक्स प्रत घेऊन यावे. असे आवाहन श्री श्रीशैल शास्त्री प्राचार्य, श्री. सिध्दलिंग शिवाचार्य वेदांत संस्कृत पाठशाळा, श्री क्षेत्र येडूर जिल्हा बेळगावी यांनी केले आहे. मो. ९००८९६७७८९.

# लोकसभा निवडणूक निकाल २४ चा अन्वयार्थ

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका २०२४ पार पडून ४ जून रोजी निकाल घोषित करण्यात आला. निकालानंतर राष्ट्रीय पातळीवर ज्या प्रकारच्या प्रतिक्रिया वेगवेगळ्या घटकांकडून, वेगवेगळ्या राजकीय पक्षांकडून, विश्र्लेषकांकडून, सामान्य माणसांकडून व्यक्त करण्यात आल्या त्यात विपर्यास मोठ्या प्रमाणात दिसून येतो. मुळात या निवडणुका वादाच्या पार्श्वभूमीवरच सुरू झालेल्या होत्या. निवडणूक आयोगाने देखील या निवडणुकांच्या तारखा ,सात टप्प्यातील आणि लगभग दोन महिन्यापेक्षा अधिक कालखंडात चाललेल्या निवडणुका वादाच्या ठरल्या नसत्या तर नवलच. एकीकडे प्रचंड उष्णता आणि त्यात राजकीय पक्षांची कमरेखालची आरोप - प्रत्यारोपाची भाषा त्यामुळे समाजमन या दोन महिन्याच्या कालावधीत अतताई राजकारणाला निश्चितपणे उबगला असेल. सामान्य माणसाला कदाचित वाईट देखील वाटत असेल. त्याच्या हितापेक्षा निवडणुका महत्त्वाच्या असंच जणू काही चित्र या निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवरती दिसून येत होत.

निकाल घोषित झाला निकालानंतर जो तो आप-आपल्या परीने आनंद व्यक्त करतोय. पण एक महत्त्वाची बाब म्हणजे ईव्हीएम यंत्राबाबत कोणत्याही राजकीय पक्षाने आपली तक्रार केली नाही. ही बाब निवडणूक आयोग आणि त्या यंत्राच्या विश्र्वासार्हतेवर शिक्कामोर्तब करणारी ठरते. त्यामुळे इथून पुढे आपल्या पराभवाचे ईव्हीएमवर कोणीही खापर फोडणार नाही ही एक जमेची बाजू या निवडणुकीतून आपल्याला पाहायला मिळते.

निवडणुकीच्या निकालानंतर ज्या काही गोष्टी आपल्याला पाहायला मिळतात त्यात नरेंद्र मोदींचा पराभव, नरेंद्र मोदींच्या विचारांचा पराभव, नरेंद्र मोदीच्या हुकूमशाही विचाराला लगाम अशा प्रकारची वक्तव्य एकीकडे तर दुसरीकडे काँग्रेस भक्कम स्थितीत पोहोचली, समाजवादी पक्षाने आपले अस्तित्व निर्माण केले, चंद्रबाबू नायडू ने पुन्हा फिनिक्स प्रमाणे झेप घेतली, भारतीय जनता पक्षाने दक्षिणेत आपले झेंडे रोवले, ममता बॅनर्जी ने पुन्हा पश्र्चिम बंगाल वरचे आपले वर्चस्व दाखवून दिले, तर उत्तर प्रदेशने त्यातल्या त्यात आयोध्या नगरीने आणि परिसराने भाजपला रामाच्या नावानेच नाकारले गेल्याच्या चर्चा सर्वत्रच ऐकायला मिळत आहेत.

महाराष्ट्रातलं राजकारण तर पूर्णपणे ढवळून निघाल आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात लोकसभेच्या पार्श्र्वभूमीवर दोन वर्षापासून सुरू असलेल्या रणसंग्राम महाराष्ट्रातल्या राजकारणाला विटाळ लावणारा ठरला होता. दोन राजकीय पक्ष फोडणे आणि प्रचंड भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्यांना आपल्या पक्षात घेणे, बरोबरीने ठेवणे हे किती महागात पडू शकतं हा देखील या निवडणुकीच्या निकालाचा अर्थ आपण लावू शकतो आणि म्हणून भावना, विचार, पक्ष या गोष्टी प्रसंगाप्रमाणे मतदारावर लागू पडतात. महाराष्ट्रातच नाहीतरी संपूर्ण भारतात बंडखोरी यापूर्वी देखील झालेली आहे मात्र त्याचे परिणाम त्या त्या वेळेला दिसून आले. नंतर मात्र सर्व काही सुरळीत असे चित्र पाहायला मिळत. पण महाराष्ट्रातल्या राजकारणात हे चित्र पूर्णपणे विस्कटून गेलेले पाहायला मिळते म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणाला भविष्यात या निकालामुळे कलाटणी मिळण्याची शकण्याची शक्यता आहे

या निकालाचा दुसरा अन्वयार्थ देशातल्या लोकशाही व्यवस्थेतील विरोधी पक्षाला असलेली महत्त्वाची भूमिका. मागच्या दहा वर्षात देशात कणखर नेतृत्व असणारा विरोधी पक्षच अस्तित्वात नव्हता. त्यामुळे मोदी हुकुमशासारखं वागत असल्याची भावना सर्वसामान्यांच्या मनामध्ये सुद्धा निर्माण झालेली होती. परिणामी मोदींना मतदारांनी धडा शिकवला अशी भाषा विरोधक करू लागले आहेत. याचा विचार करता मतदारांनी ५५% म्हणजेच २४० जागेवर भारतीय जनता पार्टीचे उमेदवार निवडून दिल्याने मोदींच्या ध्येय धोरणाला, कार्यक्रमाला केवळ ५०% लोकांचा पाठिंबा असल्याचा अर्थ देखील आपणास काढता येऊ शकतो. नरेंद्र मोदींना ३.० मधील आपल्या सरकारचं अस्तित्व पुन्हा एकदा नव्याने एनडीए च्या सहकार्यासोबत चालवावं लागणार आहे. त्यामुळे एक मुखी निर्णय, एक मुखी अंमलबजावणी या धोरणाला आता खीळ बसणार आहे. त्याची सुरुवात बिहार मधील जनता दलाच्या वतीने केलेल्या वेगवेगळ्या निर्णयांच्या बाबतीत पुनर्विचार करण्याची शक्यता असल्याचे प्रतिपादन करून केली आहे. तर दुसरीकडे चंद्रबाबू नायडू यांनी वेगवेगळी महत्त्वाचे खाते मागून भारतीय जनता पार्टीचे तिसऱ्या टप्प्यातील सरकार हे काटेरी वाटेवर चालणारे आणि दोरीवरची कसरत करणारे ठरणार यात शंका नाही. त्यामुळेच काँग्रेसचे मलिकार्जुन खरगे यांनी आज आम्ही घाई गडबड न करता योग्य संधी आणि वेळेची वाट पाहू आणि सत्ता स्थापनेचा दावा करू हे केलेले विधान म्हणजेच भविष्यात एनडीए मध्ये निर्णयाच्या, अंमलबजावणीच्या वरून मतभेद निर्माण होऊ शकतात आणि त्यांचा पाठिंबा आपल्याला मिळू शकतो हा आशावाद खरा की खोटा ठरणार हे भविष्यात कळू शकेल.

निवडणुकीतून चांगले, वाईट, सुशिक्षित, महिला आणि त्याचबरोबर देशद्रोहाचा आरोप असणाऱ्या दोघांना संसदेवर निवडून जाण्याचा संधी मिळाले. म्त्यामुळे निवडणुकीचा आणखीन एक अन्वयार्थ काढताना मतदाराने नेमक्या कोणत्या व्यक्तीला आपलं नेतृत्व सोपवावं याचा विचार अजूनही समाजात तितका खोलवर रुजलेला नाही हे दिसून येतं. समाजात आजही साम-दाम, दंड, भेद, जात, धर्म, पंथ, भाषा याचा आधार निवडणुकांमध्ये घेतला जातो आणि त्यातून कुरघोडी करण्याचे प्रयत्न होतात नव्हे त्याचीच समीकरणे बसवण्याचा प्रयत्न होतो. हे देखील महाराष्ट्रातल्या मराठवाड्यातल्या आणि अनेक मतदारसंघातील निकालांनी सुद्धा दाखवून दिलेल आहे. जातीची समीकरण, राज्यातील आंदोलने, शेतकऱ्यांचे कांदा, सोयाबीन नुकसान भरपाई, पिक विमा सारखे प्रश्न राज्यात होत असलेल्या विविध आरक्षण समर्थनातील आंदोलने यांचाही या निवडणुकीवर प्रचंड प्रभाव पडलेला दिसतो. म्हणून निकालाने आम्हाला हा देखील विचार करायला भाग पडले आहे. म्हणून निकालानंतर प्रत्येक जण आनंदी असल्याचे आपल्याला पाहायला मिळते. असं क्वचित वेळा घडतं आणि हे २०२४ च्या निवडणुकांनी आपल्याला दाखवून दिलं कितीही आरोप प्रत्यारोप झाले, कितीही विकासात्मक योजना राबवल्या तरी अनेक गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणून निकालाकडे पाहणं हे अत्यावश्यक ठरतं. २०२४ चा निकाल केवळ भारतीय जनता पार्टीला दिलेला धक्का नसून तो त्यांच्यासोबत असणाऱ्या घटक पक्षांना देखील तो देण्यात आलेला आहे. इंडिया आघाडीने केवळ मोदी विरोध न करता काही स्थानिक व विकासात्मक मुद्दे घेऊन या निवडणुकीत आपला फोकस केलेला असल्यामुळे त्यांना हे यश संपादन करता आले. देशातल्या प्रत्येकालाच निवडणूक निकालाचे वेगवेगळे पैलू पाहता येऊ शकतात

**- प्रा. शिवशंकर पटवारी लातूर**

# झरी(बुद्रुक) येथील शिबिरामध्ये ५२९ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार




**उदगीर (प्रतिनिधी)** धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल,उदगीर आणि ग्रामपंचायत कार्यालय-विविध कार्यकारी सेवा सोसायटी,झरी(बुद्रुक) यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार,दिनांक:-०१ जुन २०२४ रोजी श्री सिद्धेश्वर नागनाथ मंदिर,झरी(बुद्रुक),ता:-चाकूर येथे आयोजित मोफ्फ्रत सर्व रोगनिदान व औषधी उपचार तथा निशुल्क नेत्ररोग-मोतीबिंदू व रक्तशर्करा (ब्लडशुगर) तपासणी शिबिराचा एकूण ५२९ रुग्णांनी लाभ घेतला.

शिबिराचे उद्धाटन अहमदपुर-चाकुर विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय-कार्यसम्राट आमदार बाबासाहेब पाटील यांचे हस्ते भगवान धन्वंतरी व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य दयानंद सुरवसे हे होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून बा.भ.शि.प्र.मंडळ,अहमदपूरचे सदस्य साहेबराव जाधव,माजी उपसभापती पद्माकर पाटील व तुकाराम पाटील आणि तसेच कृ.उ.बा.स.संचालक राहुल सुरवसे,नामदेव सुरवसे,नारायण राजुरे,गणेश सूर्यवंशी,शेख आयडी,हैदर सय्यद,पांडुरंग सूर्यवंशी,एडवोकेट श्रीनाथ सावंत,अमोल सुर्यवंशी,हेमंत पाटील,युवराज काका सूर्यवंशी,ज्ञानोबा जाधव,विठ्ठल उदगिरे,बाळासाहेब सूर्यवंशी,विवेक शिंदे,दिलीपजाधव,बबन गव्हाणे,सुभाष अल्लापुरे,नितीन पाटील,सुनील सूर्यवंशी,धनराज धुमाळे,गणेश गायकवाड,माऊली कासले,विश्वंभरराव पाटील,शेषराव चावरे,गिरिजाप्पा इडुरे,तुकाराम सुगावकर,गणेश डोंगरे,रामदास सुरवसे,नारायणराव राजुरे,अमोल सूर्यवंशी,इत्यादीमान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकपर भाषणात प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील यांनी धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल,उदगीर च्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या मोफ्फ्रत विविध आरोग्य विषयक उपक्रम-शिबीरासंबंधी माहिती दिली.

उद्धाटनपर भाषणात आमदार बाबासाहेब पाटील म्हणाले की निरोगी आयुष्यासाठी नियमित व्यायाम तथा योग व प्राणायाम याच्या सोबतच सकस व संतुलित तथा नियमित आहार यासोबतच रोगानुसार अपेक्षित असलेले पथ्यापथ्याचे पालन अत्यंत महत्त्वाचे आहे. आयुर्वेद चिकित्सा ही स्वास्थ्य रक्षण व रोगाचे उच्चाटन या पद्धतीने काम करते.त्यामुळे नागरिकांनी कोणताही आजाराकडे दुर्लक्ष न करता वेळीच तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार करून घेणे आवश्यक आहे.राष्ट्राच्या दरडोई उत्पन्नामध्ये निरोगी व्यक्तीचे अनन्य साधारण महत्व असते असे सांगितले.

उद्धाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षीयसमारोपप्रसंगी बोलताना दयानंद सुरवसे यांनी ग्रामीण भागातील नागरिकांसाठी मोफ्फत रूम निदान औषध उपचार शिबिर ही मोठी संधी असून नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

शिबीराच्या समारोप प्रसंगी बोलताना बा.भ.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष व माजी मंत्री बाळासाहेब जाधव म्हणाले की निरोगी व्यक्तीमुळे संबंधित कुटुंब सुखी व आर्थिक दृष्ट्या संपन्न होते तथा सशक्त-समृद्ध समाज व प्रगत राष्ट्र निर्माण होते.

शिबीरामध्ये वातविकार-१०४;मधुमेह-३५;मुळव्याध-१५;त्वचाविकार-३५ हार्नीया व हायड्रोसिल-११ नेत्ररोग-४९;दंतरोग-१९; श्वसनविकार-२८;पोटाचे विकार-३६,लहान बालकांचे आजार-३२; स्त्रियांचे विकार(मासीकपाळी समस्या,ई)-४५,ईत्यादी-विविध आजारांच्या एकूण ५२९ रुग्णांची तपासणी व रोगनिदान करुन आवश्यकतेनुसार औषधी उपचार करण्यात आले.

शिबिरामध्ये लॉयन्स नेत्र रुग्णालय,उदगीर यांच्या सहकार्याने मोफ्फ्रत नेत्ररोग तपासणी करून एकूण ५८ व्यक्तींचे मोतीबिंदू आजाराचे निदान झाले व या नोंदणी केलेल्या व्यक्तींवर त्यांच्या सोयीनुसार लवकरच पुढील औषधोपचार व शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात येणार आहे.

शिबिराच्या उद्धाटन व समारोप कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.जयेश कर्डिले यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.मंगेश मुंढे यांनी केले.

शिबीरामध्ये डॉ.अमोल पटणे,डॉ.नामदेव बनसोडे,डॉ.प्रशांत बिरादार,डॉ.योगेश सुरनर,डॉ.गुरुराज वरनाळे,डॉ. विषणूकान्त जाधव,डॉ.शिवकुमार मरतुळे,डॉ.रश्मी सुखदेवे,डॉ.प्रीती रोडगे तथा आंतरवासियता प्रशिक्षणार्थी व कार्यालयीन-रुग्णालयीन कर्मचारी यांनी वैद्यकीय सेवा दिली.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी आकाश पाटील,चांद पठाण,गोविंद सुरवसे,धोंडीराम मुधळे,महबूबपठाण,व्यंकट पाडळे,विठ्ठल डोंगरे,हरेश्वरसुरवसे,प्रणव गुंडरे,अभिषेक म्हेत्रे,गोपाळपाटील,वैभव सुरवसे,ऋषिकेश गुंडरे,दशरथ भांडे,शंकर मुधाळे,बालाजी बुद्धे,ईत्यादींचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. राजपाल पाटील यांनी केले, पाहुण्यांचा परिचय डॉ.बळीराम भुक्तरे यांनी करून दिला तर आभार हणमंत म्हेत्रे यांनी व्यक्त केले.

## टी.सी हरवली आहे

माझी संजना तानाजी कुंटे या नावाची इयत्ता १२ वी पासची मुळ टि.सी. दि. ०१/०६/२०२४ रोजी उदगीर ते जानापुर प्रवासात हरवली आहे. जर कोणास सापडल्यास संपर्क : मो. नं. ९०१९५७२३९५

# देवत्वाची जाणीव करून देणारी श्री तुकाराम महाराजांची गाथा होय- हरिदास महाराज तमेवार

**उदगीर (प्रतिनिधी)** प्रतिनिधी , - धमभेद मानू नका हे सांगत चातुर्वर्ण्य संकल्पनेस विरोध करणारे संत तुकाराम महाराज यांनी अंधश्रद्धा आणि कर्मकांडावर वार केलेला आहे. वृक्ष संवर्धना बरोबरच सामाजिक एकात्मतेचा पुरस्कार करणारे, मानवी जीवनाचा उद्धार करणारे तुकाराम महाराज यांनी त्यांचे विचार आपल्या अभंगातून सर्वत्र पसरवलेले आहेत. ते विचार सर्व काल सुसंगत ठरतात. त्यांच्या अभंगाची गाथा समजून घेतली तर देव भेटण्यापेक्षा तो देव कळतो. विरक्ती शिवाय मुक्ती नाही म्हणत




देवत्वाची जाणीव करून देणारी श्री तुकाराम महाराजांची गाथा होय असे विचार ह. भ. प. हरिदास महाराज तम्मेवार यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत अखंडितपणे चालू असलेल्या वाचक संवादाचे ३१४ वे पुष्प विलास निंबोरकर, गडचिरोली यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या संवादात संत साहित्याचे अभ्यासक ह.भ.प. हरिदास महाराज तम्मेवार, अहमदपूर यांनी कै.ह.भ.प.बाबुराव देवडीकर कृत श्री तुकाराम महाराजांची गाथा या ग्रंथावर बोलताना तम्मेवार म्हणाले, कुठल्याही समस्येची उकल करून त्यावर खरा उपाय सांगतात ते संत. वारकरी संप्रदायाचा संत तुकारामांनीच तर खऱ्या अर्थाने प्रचार प्रसार केला. आपल्या देशात सर्व जाती धर्मातून संत झालेले आहेत. त्यांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून बाहेर फिरणाऱ्यास मंदिरात आणले, मंदिरात आलेल्यास झोपून नका म्हणत जागे असणाऱ्यास देव समजून घ्यावयास भाग पाडले, देव समजलेल्यास माणुसकीची जाणीव करून दिली. असे सांगत अनेक अभंगाच्या उदाहरणासह वेगवेगळ्या संतांची नावे घेत देव कुणाचेही काम करत नाही, तर तो भक्तांच्या कामात कसा मदत करतो हे देखील तमेवार यांनी पटवून दिले.

यानंतर झालेल्या चर्चेत मोहन महाराज निडवंचे, बाबुराव सोमवंशी, बालाजी बिरादार यांचेसह अनेकांनी सहभागनोंदवला. यावेळी इयत्ता दुसरीत शिकणारी कु.शर्वरी अमोल सोमवंशी हिने दोन बेडूक हि कथा सांगितली. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना निंबोरकर , गडचिरोली.यानी साजेसा समारोप केला.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. राजपाल पाटील यांनी केले, पाहुण्यांचा परिचय डॉ.बळीराम भुक्तरे यांनी करून दिला तर आभार हणमंत म्हेत्रे यांनी व्यक्त केले.

## तहसिलदार कार्यालय, जळकोट

(शाखा दंडणीय )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.३१/०५/२०२४

### जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार अहमद मौलाना सिद्दीकी वय ४८ वर्ष रा. पाटोदा खु ता. जळकोट जि. लातुर यांच्या मुलीच्या नामे सारा अहमद सिददीकी यांचा जन्म मौजे पाटोदा खु ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक. २२/०३/२००७ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील सारा अहमद सिद्दीकी यांचा जन्म दिनांक २२/०३/२००७ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सारा अहमद सिददीकी यांचा जन्म दिनांक २२/०३/२००७ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू सारा अहमद सिददीकी यांचा जन्म दिनांक-२२/०३/२००७ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा खु ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ३१/०५/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख ३१/०६/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३५०/२०२४ निशाणी क्रमांक ०८

ज्याअर्थी नामे Jaymala Chandrakant Chivate हे R/o. Dhondihipparga Tq.Udgir Dist.Latur दिनांक २७/०३/२०२४ रोजी At. Rubi Hall Clinic Wanwadi, Pune येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Chanrakant Gurunathrao Chivate, Age 51, Occu- Agri- Ex- Army
2) Vishakha D/o. Chandrakant Chivate, Age 24, Occu- Education
3) Vishal S/o. Chandrakant Chivate, Age 19, Occu- Education

R/o. Dhondihipparga Tq.Udgir Dist.latur

यांनी खालील नमूद ३ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Chanrakant Gurunathrao Chivate | 51 | Husband |
| 2) | Vishakha D/o. Chandrakant Chivate | 24 | Daughter |
| 3) | Vishal S/o. Chandrakant Chivate | 19 | Son |

अर्जदार याने Jaymala Chandrakant Chivate या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Jaymala Chandrakant Chivate यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. आज दिनांकः २८/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः ०८/०७/२०२४

आदेशावरुन

(के.डी.सुर्यवंशी)
कनिष्ठ लिपिक
२ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

सहा.अधिक्षक,
सहदिवाणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## सहयोग अर्बन को-ऑप बँक लि.उदगीर

शास्त्री कॉलनी, नवी आबादी, नगर परिषदेच्या पाठीमागे, उदगीर ४१३५१७

### जाहीर सुचना

Re- KYC अद्यावत KYC कागदपत्रे पुनश्च सादर करणे बाबत.

बँकेच्या सर्व खातेदारांना सूचीत करण्यात येते की, भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे बँकेला ग्राहकांच्या खात्यांसाठी, ग्राहकांची अद्यायावत (Updated) केवायसी कागदपत्रे वेळोवेळी प्राप्त करणे बंधनकारक आहे. तसेच विद्यमान Prevention of Money Laundering Act, 2002 च्या तरतूदीनूसार आपल्यावर देखील केवायसी कागदपत्रे देण्याचे बंधन आहे. ग्राहकांनी बँकेस, बँकेच्या मागणी अनुसार आपली अद्ययावत KYC कागदपत्रे त्वरीत सादर करावीत ही विनंती. तसेच सध्या आपण खात्यावर खातेव्यवहार करीत नसल्यास, पुन्हा आपले व्यवहार सुरु करावेत. यासंबंधी शाखास्तरावर उपलब्ध करण्यात आलेले KYC फॉर्म भरुन आम्हास सहकार्य करावे.

आम्ही आपल्याला KYC कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी सदर जाहीर नोटीस सूचना देत आहोत आपण सदर नोटीसीच्या दिनांकापासुन ३० दिवसांचे आत KYC कागदपत्रांची आवश्यक पूर्तता करावी. आपल्या खात्यासाठी KYC कागदपत्रांची पूर्तता न केल्यास रिझर्व बँकेच्या मार्गदर्शी सुचनेनूसार, बँकेला आपल्या खात्यावरील व्यवहार थांबविणे नाईलाजास्तव भाग आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

कृपया अधिक माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी आपले संबंधीत शाखाव्यवस्थापक यांच्याशी त्वरीत संपर्क साधावा. आम्हास आपल्या सक्रीय सहकार्याची अपेक्षा आहे.

उदगीर, दिनांक ०४/०६/२०२४ डोळे नारायण नागेश
मुख्य कार्यकारी अधिकारी




उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| | | | |
|---|---|---|---|
| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |

| | |
|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS) | डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव



# उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे जगदीश रणदिवे या निराधारास अनुसुचीत जातीचे प्रमाणपत्र देऊन दिला आधार

लातूर / प्रतिनिधी- ता. ६ दयानंद कला महाविद्यालयातील इयत्ता ११वी चा विद्यार्थी श्री.जगदीश उत्तम रणदिवे राहणार जेवळी ता. जि. लातूर येथील रहिवासी असून त्याच्या आई व वडीलांचे निधन झाले.

त्याचे प्राथमिक शिक्षण पहिली ते चौथी शारदा आश्रम शाळेत पूर्ण झाले त्यानंतर माध्यमिक शिक्षण १० वी पर्यंत चे ज्ञानसागर विद्यालय हासेगाव येथे पूर्ण झाले. तो माध्यमिक शिक्षण घेत असताना पूर्ण वेळ हासेगाव येथील सेवालालयात राहत होता.

इयत्ता अकरावी साठी त्याने दयानंद कला महाविद्यालयात प्रवेश घेतला. सेवालयातूनच येणे-जाणे करून अकरावीचे शिक्षण पूर्ण केले आहे. त्याच्याकडे जातीचे प्रमाणपत्र नसल्यामुळे तो शिष्यवृत्तीचा फॉर्म भरू शकत नव्हता.

महाविद्यालयातील पर्यवेक्षक डॉ.दिलीप नागरगोजे यांच्याशी शिष्यवृत्ती फॉर्म च्या संदर्भात चर्चा केली चर्चे अंती असे निर्दशनास आले की, सदरील विद्यार्थ्याचे मुळ गाव विद्यार्थ्यास माहित नव्हते तेव्हा सरांनी त्याचे मूळ गाव, प्राथमिक शाळेत चौकशी करून शोधले व त्यानुसार त्याचा



प्राथमिक शाळेचा प्रवेश निर्गम उतारा प्राप्त केला, माध्यमिक शाळेतील प्रवेश निर्गम उतारा प्राप्त केला व त्याच्या दहावीच्या टीसीचा आधार घेऊन अनुसचित जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठीचा अर्ज उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सेतुच्या माध्यमातून दाखल केला. याची सर्व माहिती श्रीमती रोहिणी नऱ्हे-विरोळे उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी, लातूर यांना प्रत्यक्ष भेटुन दिली व प्रमाणपत्राची विनंती केली. महसुल विभागाच्या या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी क्षणाचा विलंब न लावता निराधार विद्यार्थ्यास प्रमाणपत्र देऊन आधार दिला. महसुल विभागाचे मुख्य लिपीक श्री. बाशीद, नायब तहसीलदार श्री. गणेश सरवदे, तहसीलदार श्री. सौदागर तांदळे, एस.डी. ओ. कार्यालयातील नायब तहसीलदार श्री. सुधीर देशमुख, मौजे जेवळी येथील ग्राम सेविका श्रीमती किनीकर, श्री. विठ्ठल रणदिवे, सेतुचे मेहकर शेख, श्री. मेहकरे या सर्वांच्या सहकार्याने कला महाविद्यालयाच्या अनाथ विद्यार्थ्यास प्रमाणपत्र प्राप्त झाले.

महसुल विभागाच्या या सर्व अधिकाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, प्रा. डॉ. दयानंद शिरुरे, डॉ. प्रशांत दिक्षीत, मुख्य लिपीक श्री. संजय व्यास, क. लघुलेखक श्री. बालकिशन आडसुळ यांनी आभार मानले.

# अंतर्गत शत्रूवरील नियंत्रणातून शिवस्वराज्य दिनाकडे वाटचाल :प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी



देगलूर (प्रतिनिधी) : स्वराज्य स्थापनेच्या अत्यंत कठीण व खडतर कार्यात परकीय शत्रूपेक्षा अंतर्गत शत्रूंचाच धोका अधिक आहे हे छत्रपती शिवाजी महाराजांनी अचूकपणे हेरले होते, त्यामुळेच त्यांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्यात प्रथमतः अंतर्गत शत्रूवर नियंत्रण प्रस्थापित करण्यावर भर दिलेला होता व त्यातूनच शिवस्वराज्य दिनाकडे अर्थात शिवराज्याभिषेक सोहळा दिनाकडे वाटचाल शक्य झालेली होती असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले. वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात ०६ जून २०२४ रोजी इतिहास विभागाच्या वतीने शिवस्वराज्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रंथपाल डॉ. अनिल जाधव, प्रा. अनिल ठोसरे मुख्य लिपीक धनंजय देशपांडे तसेच गंगाराम मलगिरवार, गंगाधर बिरादार यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी म्हणाले की, अंतर्गत दुहीची, फुटीची विघातक वृत्ती देशाला अगदी प्राचीन काळापासून ते आजपर्यंत त्रासदायक ठरलेली असून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळात अशा विघातक वृत्तीवर मात करूनच स्वराज्य स्थापनेचे कार्य पूर्णत्वाला नेलेले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ. अनिल जाधव यांनी केले तर आभार प्रा. अनिल ठोसरे यांनी मानले.

# शिवा संघटनेकडून म. बसवेश्वर जयंती निमित्त शोभायात्रा आज

देगलूर(प्रतिनीधी): भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या देगलूर शाखेच्या वतीने प्रति वर्षा प्रमाणे यंदाही महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त भव्य शोभायात्रा चे आयोजन करण्यात आले आहे.

उद्या ७ जून रोजी दुपारी ४ वाजता शिवा संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा बसवेश्वर यांच्या ८९३ व्या जयंती निमित्त भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले. शिवा संघटनेच्या वतीने देगलूर येथे भव्य मिरवणूक काढण्याची हि प्रथा सन २००४ पासून म्हणजेच मागील २१ वर्षांपासून शहरांमध्ये शोभायात्रा काढली जाते व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.

मनोहर धोंडे ,जिल्ह्यातील शिवाचार्य महाराज ,उद्घाटक म्हणून नांदेड चे नवनिर्वाचित खासदार वसंतराव चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे,आमदार जितेश अंतापुरकर,अनिल शेटकार,माजी नगराध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार,माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार,दीपक रामपूरकर आदी उपस्थित राहणार आहेत. हि भव्य शोभायात्रा शुक्रवार दुपारी ठिक ४ वाजता देगलूर येथील गांधी पुतळ्या पासून आरंभ होत असून ते नविन सराफा ते महात्मा बसवेश्र्वर चौक - जुना सराफा ते लोहिया मैदान - डॉ. एकलारे यांचा जुना दवाखाना- भारत फॅन्सी कॉर्नर ते नगरेश्र्वर मंदिर येथे शोभायात्रेचे समारोप भव्य अशा सभेत होणार आहे. या शोभायात्रेत ढोल ताशा, भजनी मंडळ, कलश धारी महिला भगिनी, टाळ मृदंगाच्या नादात शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र-कर्नाटक बसचा देगलूरजवळ भीषण अपघात

एक गंभीर तर १९ प्रवासी जखमी

देगलूर(प्रतिनीधी): बिदर आगाराच्या बसचालकास भरपावसात वळणावर बस वळवता न आल्याने ती बिलोली आगाराच्या बसला समोरून वेगात घडकली. या अपघातात बिलोली आगाराच्या बसचा समोरील भाग चक्काचूर झाला. त्यात बिलोली आगारातील बसचा चालक गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी नांदेडला पाठविण्यात आले आहे. तर अन्य २० प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

हा अपघात देगलूर शहराजवळ लेंडी नदीच्या पुलाजवळील वळणावर बुधवारी दुपारी अडीच वाजता घडला. बिलोली आगाराची बस (चक १४ इढ १७८०) ही देगलूरहून बिलोलीकडे जात होती. ही बस लेंडी नदीचे पूल ओलांडून वळणावर असतानाच नांदेडहून बीदरकडे जाणाऱ्या कर्नाटक आगाराच्या बसने (केए- ३८ एफ १०१३) बिलोली आगाराच्या बसला धडक दिली. यात बसच्या समोरील भागाचा चक्काचूर झाला. अपघात घडताच खानापूर फाट्यावरुन देगलूरकडे येणाऱ्या पोलिसांनी बसचालकास नागरिकांच्या मदतीने



बाहेर काढून उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. या अपघातात बिलोली आगाराचे बसचालक राहुल मल्हारी हादगले यांच्या दोन्ही पाय व दोन्ही हात फ्रॅक्चर झाले आहेत तसेच पाठीत गंभीर मार लागले असून प्राथमिक उपचारानंतर नांदेड जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.दरम्यान अपघातस्थळी सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील घोंगडे, बीट जमादार मोहन कनकवले, सुधाकर मलदोडे, सुनील पत्रे व अन्य कर्मचारी आणि देगलूर बस डेपोचे आगारव्यवस्थापक संजय आकुलवार यांनी जखमींना उपचारास नेण्यासाठी प्रयत्न केले. अपघातानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. यामुळे जवळपास दोन तास रस्त्यावरील वाहतूक खोळंबली होती.या अपघातात दोन्ही बसमधील प्रवाशी घाळप्पा मड़ीवाळ (३५ वर्ष,बीदर),मण्णाजी बक्कलवाड (५९ वर्ष ,खानापुर ),नागमणि कोंडावार (५० वर्ष ,बिचकुन्दा जिला कामारेड्डी ),अरुणा राखे (२५ वर्ष,लोहगांव ता. बिलोली),लक्ष्मण कणलेवार (७० वर्ष,हिंगणी ता.बिलोली),राजू गूजलवार (४१ वर्ष,बड़ूर ता.बिलोली),इरफ़ान पठान (२५ वर्ष,बोधन जिला निजामाबाद ),शाइन बेगम पठान (५५ वर्ष,बोधन ),शेख समीर शेख रौफ (२८ वर्ष , परभणी ),गंगाबाई मलकुलवार (६० वर्ष,कुंडलवाड़ी ता.बिलोली),शुभम जायवार (१४ वर्ष,कुंडलवाड़ी ता.बिलोली),शेख नासिर शेख नूर (२२ वर्ष,परभणी ),शेख आसिफ (३५ ,परभणी ),सुधाकर वाघमारे (६५ वर्ष,पोकर्नी ता.बिलोली),वैभव राहेगावकर (३५ वर्ष,विशालनगर,नांदेड़ ),विनय मड़ीवाळ (५ वर्ष,बीदर ) आदी जखमींवर उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले.

पान १ वरून

### एनडीएचा...

कानशिलात लगावली असल्याचा आरोप कंगनाने केला.

कंगना रणौतला का मारले?

कंगनाच्या राजकीय सल्लागारांनी दिलेल्या माहितीनुसार, चंदिगड विमानतळावर हा सगळा प्रकार घडला. सीआयएफएफच्या महिला जवानाने कंगनाच्या कानशिलात लगावली. कंगनासोबत गैरवर्तवणूक करणाऱ्या महिला सीआयएसएफ जवानावर कारवाई करावी. शेतकरी आंदोलनावर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी सीआयएसएफ महिला जवान कंगनावर नाराज होती.

दिल्लीला जात होती कंगना

हिमाचल प्रदेशमधील मंडी लोकसभा निवडणुकीत कंगनाने दणदणीत विजय मिळवला. त्यानंतर ती आज दिल्लीला रवाना झाली. याच दरम्यान चंदिगड विमानतळावर तिच्या कानशिलात लगावली असल्याचे वृत्त समोर आले. कंगनाने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर दिल्लीला जात असल्याचे सांगितले.

विमानतळावरून काहीच बोलता निघून गेली कंगना

कानशिलात लगावल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर दिल्ली विमानतळावर पोहचलेल्या कंगना रणौतला पापाराझींनी या घटनेबाबत विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी विचारलेल्या प्रश्र्नावर कंगनाने कोणतेही भाष्य केले नाही.

राजकारणात नशीब आजमावण्यासाठी कंगना राणौत पहिल्यांदाच मंडीतून रिंगणात उतरली. भाजपने कंगनाला तिच्या स्वतःच्या जिल्ह्यातून मंडी मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. निवडणुकीत कंगनाने जोरदार प्रचार केला. काँग्रेसचे उमेदवार विक्रमादित्य सिंह यांना कंगनाने ७४ हजारांच्या मताधिक्याने पराभूत केले.

### काँग्रेसच्या...

सरकारच्या धोरणाविरोधात जनतेतून मोठ्या प्रमाणात उठाव झाला. मराठा, धनगर, ओबीसी आरक्षणाचाही मुद्दा निवडणुकीत चांगलाच गाजला. हे सर्व प्रश्र्न विशाल पाटील यांच्या पथ्यावर पडले. जत विधानसभा मतदारसंघ वगळता सांगली, मिरज, खानापूर, पलूस-कडेगाव, तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात विशाल पाटील यांना चांगले मताधिक्य मिळाले.

### पराभव...

केला होता. सुनील तटकरे, धनंजय मुंडे भाजपसोबत जातील, असंही रोहित पवार म्हणाले होते. आम्हाला नेता बनण्याची घाई झाली नाही. भाजपने खाली राजकारण नेलं होतं. ते पुन्हा व्यवस्थित करायचं आहे. जेव्हा अनेक नेते धमक्या देत होतें त्यावेळी आम्ही म्हणत होतो की जनता हे सर्व काही बघत आहे. अनेक लोकांच्या झोपा आता उडाल्या आहेत. महाराष्ट्राला पुन्हा एक नंबरच राज्य करायचे आहे. वंचित आमच्यासोबत आले असते तर नक्की आणखी वेगळं चित्रं पाहिला मिळालं असतं.

सुनेत्रा पवारांचा पराभव-

बारामतीत नणंद सुप्रिया सुळेंनी भावजय सुनेत्रा पवारला जोरदार धक्का दिला आहे. बारामती राखण्यात सुप्रिया सुळेंना यश मिळाले आहे. तर अजित पवार गटाच्या सुनेत्रा पवारांचा पराभव झाला आहे. सध्या बारामतीत जल्लोष समोर आला आहे. बारामतीचा पराभव हा अजित पवारांसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

### शेतकऱ्यांकडून...

रूपये स्विकारण्याचे मान्य केले त्यास पोलिस उपनिरीक्षक मोरे यांनी लाच देण्यास प्रोत्साहन दिले. गुरूवारी (ता. ६) दुपारी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात शासकीय पंचासमक्ष २० हजार रूपये स्विकारताना पोलिस हवालदार पांडुरंग दिगंबर दाडगे (वय ४३) यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी रकमेसह ताब्यात घेतले. तसेच पोलिस उपनिरीक्षक दिलीप रघुत्तमराव मोरे यास चाकूर पोलीस ठाणे येथून ताब्यात घेतले आहे. याबाबत चाकूर पोलिसात गुन्हा दाखल केला जात आहे. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधिक्षक डॉ. राजकुमार शिंदे, पोलिस उपअधिक्षक संतोष बर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक भास्कर पुल्ली, फारूक दामटे, भागवत कठारे, भिमराव आलुरे, शाम गिरी यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

### लातूर कृषि...

महाविद्यालयाने संयुक्त उपक्रम हाती घेतला असून या अंतर्गत ४ एकर जागेवर सुमारे ४८ हजार झाडे लावली जाणार आहेत. मियावाकी पद्धतीने साकारण्यात येणाऱ्या या जंगलात प्रति चौरस मीटरमध्ये ३ वृक्ष लावले जातील. यामध्ये विविध ५०० प्रजातींच्या वृक्षांचा समावेश राहील. या कामाला पर्यावरण दिनापासून सुरुवात करण्यात आली. पहिल्या टप्प्यात १ एकर परिसरात वृक्षारोपणाची पूर्वतयारी करण्यात आली आहे. याठिकाणी सुमारे १२ हजार झाडे लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

कृषि महाविद्यालयाच्या प्रियदर्शनी मुलींचे वसतिगृह परिसरातही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सागर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कृषि महाविद्यालयाने वृक्ष लागवडीचा अभिनव पॅटर्न निर्माण करावा : जिल्हाधिकारी

कृषि महाविद्यालयात शिकणारा विद्यार्थी, विद्यार्थिनी यांचे नाते थेट निसर्गाशी जोडलेले असते. शेतीशी निगडीत असणारा अभ्यास हा निसर्गाशी निगडीत असतो. कोणत्या वृक्षाची वाढ कशी होईल, कोणत्या जमिनीवर कोणते झाड जगेल, याबाबत कृषि विद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक चांगली माहिती असते. त्यामुळे कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनव संकल्पना वापरून, अभ्यासाचा उपयोग करून महाविद्यालय परिसरातील, वसतिगृह परिसरातील मोकळ्या जागेत वृक्ष लागवड करावी. यामाध्यमातून वृक्ष लागवडीचा अभिनव पॅटर्न निर्माण करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी विद्यार्थ्यांसाठी संवाद साधताना केले.

एक विद्यार्थी-एक वृक्ष उपक्रम राबवावा : मुख्य कार्यकारी अधिकारी

लातूर कृषि महाविद्यालयात शिकणाऱ्या विशेषतः येथील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवडीमध्ये पुढाकार घ्यावा. महाविद्यालयाने एक विद्यार्थी-एक वृक्ष मोहीम राबवून वृक्ष लागवडीला प्रोत्साहन द्यावे.

वृक्ष संगोपनाला प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करावे. वसतिगृह परिसरातील वृक्ष लागवडीची जबाबदारी विद्यार्थ्यांनी घेवून आपल्या शिक्षणाच्या काळात या वृक्षाची जोपासना करावी, असे आवाहन त्यांनी केले.

### देवेंद्र फडणवीसांची...

फडणवीस यांच्यावर फोडल्यास पक्षश्रेष्ठींची अडचण होणार आहे. त्यांना तोच न्याय उत्तरप्रदेशातील अपयशाबाबत मुख्य मंत्री योगी आदित्यनाथ यांना लावावा लागेल व मुख्य मंत्री पदाचा राजीनामा घ्यावा लागेल. महाराष्ट्रात शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस फोडल्याचा मोठा फटका भाजपला बसला. उद्धव ठाकरे व शरद पवार यांनी विश्वासघात केल्याने व शब्द न पाळल्याने त्यांना दंड देण्याची सूचना केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी केली होती.

### खा. डॉ. शिवाजी...

महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी नूतन खासदार डॉ. शिवाजी काळगे व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख,आमदार धीरज विलासराव देशमुख यांचे लातूर लोकसभा निवडणुकीत काँग्रेस महाविकास आघाडीने विजय संपादन केल्याबद्दल अभिनंदन केले. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेला माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व नूतन खासदार डॉक्टर शिवाजी काळगे यांनी संबोधित केले.

दरम्यान लातूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी काँग्रेसचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे यांचा माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख,आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या ध्येय,धोरणाला बांधील राहून नूतन खासदार डॉक्टर शिवाजी काळगे सर्व समाज घटकांच्या हितासाठी कार्यरत राहतील या लोकसभा निवडणुकीत लातूरसह मराठवाडा, महाराष्ट्र आणि संपूर्ण देशात काँग्रेस पक्ष आणि इंडिया आघाडीच्या बाजूने जनतेने कौल दिला असून हा कौल संविधान रक्षणासाठी मिळाला असल्याची आपली भावना आहे असे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की मराठवाड्यात महाविकास आघाडीने आठ पैकी सात जागा जिंकल्या असून येथे मिळालेले हे यश लक्षवेधी असल्याचे नमूद करून वाढती महागाई बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या कष्टाचे योग्य मोल मिळत नसल्यामुळे जनतेच्या मनात विद्यमान सत्ताधाऱ्यांबद्दल प्रचंड चीड आहे,मतदानाच्या माध्यमातून जनतेने तो राग व्यक्त केला असल्याचे निवडणूक निकालावरून दिसून येत आहे. अनेक समस्यांमुळे अडचणीत असलेल्या देशातील जनतेला आधार देण्याचे काम यापुढील काळात इंडिया आघाडी करेल असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

ते म्हणाले की या लोकसभा निवडणूक काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तसेच महाविकास आघाडीचे वरिष्ठ नेते तसेच आघाडीतील सर्वच घटक पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी या निवडणुकीत जे परिश्रम घेतले, त्याचा परिणाम निवडणूक निकालातून दिसून आला आहे, आघाडीच्या या यशाबद्दल आघाडीचे सर्व नेते , पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे हार्दिक अभिनंदन करून या निवडणुकीत जनतेकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला त्याबद्दलही जनतेचे मनःपूर्वक आभार त्यांनी मानले.

यावेळी विजय देशमुख,रवींद्र काळे,संतोष देशमुख, गोरोबा लोखंडे, शिवाजीराव हुडे, लिंबन महाराज रेशमे,अविनाश रेशमे,कल्याण पाटील,सुनील बसपुरे, सुनील पडीले,विष्णुपंत साठे,प्रा.शिवाजी मुळे, बालाजी कदम, चंद्रकांत ठेंगेटोल,शरद पवार, ऍड.समद पटेल,श्याम भोसले,डॉ. अशोक पोद्दार, डॉ. सतीश बिराजदार,कल्याण पाटील,शीलाताई पाटील, हमीद शेख,उषा कांबळे,अजित माने, जितेंद्र स्वामी, डॉ. अरविंद भातांब्रे, चांदपाशा इनामदार, प्रवीण सूर्यवंशी, बालाजी पंडागळे, स्वयंप्रभा पाटील,प्रा. स्मिता खानापुरे,सपना किसवे,शितल मोरे, सुलेखा कारेपूरकर, चंद्रकांत मदे, असिफ बागवान,अभिजीत दिघे, महेश काळे,शरद देशमुख, रघुनाथ शिंदे, अकबर माडजे, विष्णुदास धायगुडे, गणेश एस.आर. देशमुख,अनिल पाटील, भैरवनाथ झडके, ऍड.देविदास बोरुळे पाटील, राम स्वामी, संभाजी सुळ, बालाजी साळुंखे, आनंद वैरागे, मीनाताई टेकाळे, शोभा ओव्हाळ,श्रीनिवास शेळके, करीम तांबोळी,किरण बनसोडे,ऍड. अंगद गायकवाड, आदिसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, महाविकास आघाडीचे विविध घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)


| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.



यशवंत
शुक्रवार दि. ७ जून २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

# उदगीर न.प.च्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण मोहिमेस प्रारंभ





**उदगीर (प्रतिनिधी)** जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांच्या मार्गदर्शनाने यावर्षी लातूर जिल्हाभर माहे जून ते ऑगस्ट दरम्यान वृक्षारोपण मोहिम राबविण्यात येत आहे. उदगीर नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने मुख्याधिकारी सुंदर बोंदर प्रशासक सुशांत शिंदे यांच्या संकल्पनेतून उदगीर नगरपरिषद कार्यक्षेत्रांतर्गत खुल्या जागा, मैदान, उद्यान या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा निर्धार आहे.

याची सुरुवात आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आनंदनगर पाण्याची टाकी परिसरामध्ये मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्यासह उपस्थित अधिकारी कर्मचारी, परिसरातील नागरिक यांच्या शुभहस्ते विविध फळझाडे व सावली देणारे वृक्ष लावून करण्यात आली.

नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने उदगीर शहरातील नागरिक, व्यापारी, समाजसेवी संस्था, गणेश मंडळ, मित्रमंडळ यांना जाहीर आवाहन करण्यात येते आहे की, आपण आपले घर अंगण, परिसर, परसबाग, खुली जागा इत्यादी ठिकाणी प्रती कुटुंब एक झाड याप्रमाणे वृक्ष लागवड चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा. त्याचप्रमाणे पावसाचे पडणारे पाणी जमिनीत मुरवावे या हेतूने रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रत्येक नागरिकांनी आपल्या घराच्या छतावरील पाणी जमिनीच्या गर्भात मुरेल या दृष्टिकोनातून प्रयत्न करावे असे आवाहन करण्यात येत आहे. सदर वृक्षारोपण मोहिम यशस्वी करण्यासाठी नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी सतिश बिलापट्टे यांच्या सह वृक्षविभाग, स्वच्छता विभाग, एनयुएलएम विभागाचे अधिकारी कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

# श्री स्वामी समर्थ ‘पालखी पादुका परिक्रमा’ आज उदगीरात



**उदगीर (प्रतिनिधी)** श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा आज उदगीर येथे आगमन होत आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोट यांच्यावतीने प्रतिवर्षी संपूर्ण महाराष्ट्रभर श्री स्वामी समर्थांची पालखी पादुका परिक्रमा संपन्न होत असते. या पालखी पादुका परिक्रमाची २७ वे वर्ष असुन आज शुक्रवार दि. ०७ जुन २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता उदगीर शहरात आगमन होवून माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांच्या निवासस्थानी थांबणार आहे.श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी पादुकांचे दर्शन संबंध महाराष्ट्रातील गावात असलेल्या स्वामी भक्तांना घेता यावे यासाठी श्री स्वामी समर्थांच्या पालखी पादुका परिक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा महाराष्ट्र संयोजक संतोष भोसले, सिध्दराम कल्याणी व श्रीकांत झिपरे यांच्या नियोजनातून संपन्न होत आहे. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी अक्कलकोट येथुन मार्गस्थ झाली असुन संपुर्ण महाराष्ट्रभर परिक्रमा होवून आज दि. ०७ जुन २०२४ रोजी उदगीर शहरात आगमन होत आहे.

सायंकाळी ५.३० वाजता उमाचौक येथे श्री. स्वामी समर्थ पादुका पालखीचे भव्य स्वागत करण्यात येणार असुन मिरवणुकीने माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांच्या निवासस्थानी महाआरती होवून मुक्कामी थांबणार आहे. शनिवार दि. ०८ जुन २०२४ रोजी सकाळी संतोष तोडकर यांच्या निवासस्थानी थांबुन स्वामी भक्तांनी दर्शन घेतल्यानंतर देवणीकडे प्रस्थान करणार आहे.

श्री.स्वामीसमर्थ पालखी पादुका दर्शनाचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, विजयकुमार निटुरे, संतोष तोडकर यांनी केले आहे.

# जळकोट तहसिल येथे जागतिक पर्यावरण दिन साजरा



**जळकोट (प्रतिनिधी)** तहसील कार्यालय जळकोटयेथेसामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने वृक्षारोपण करून जागतिक पर्यादिन दिन ता. ५ जून रोजी साजरा करण्यात आला. तहसीलदार सुरेखा स्वामी, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार यांच्या मार्गदर्शनाखाली सूर्यवंशी एस अव्वल कारकून, शिंदे बी एल उप कोषागार अधिकारी, बुक्के सुधाकर सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली.

यावेळी पवार व्ही के , एम्पले शिवराज,माळवतकर, राहुल खंदाडे, आर व्ही पाटील, पी बी श्रीमंगले, एस बी वनरक्षक डोंगरे बालाजी, वेंकट नागलगावे गवळे कोंडीबा, जोगपेटे, वाघमारे राजेंद्र, ए ए हजारे, उत्तम मामा आदी कर्मचारी उपस्थित होते.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उदयगिरित वृक्षारोपण

**उदगीर (प्रतिनिधी)** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले यावेळी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ.रेखा रेड्डी, डॉ.रामप्रसाद लखोटिया, संस्था सदस्य बसवराज पाटील नागराळकर, प्राचार्य डॉ.आर.के.मस्के, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. आर.बी.अलापुरे, पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.जे.एम.पटवारी, कार्यालय अधीक्षक श्रीमती प्रतिभा गायकवाड तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




# यशवंतचे बारावी Neet परीक्षेत यश





**वाढवणा (प्रतिनिधी)** २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी छशर्शीपरीक्षेत यशवंत कनिष्ठ महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे १) शिंदे किशोर नीलकंठ ७२० गुण २) अक्कलगिरे अर्जुन दत्तात्रय ६४४ गुण ३) बोडेवार कृष्णा बस्वराज ६३४ गुण घेऊन एमबीबीएसच्या प्रवेशासाठीपात्रठरलेले आहेत ही यशवंतच्या शिरपेचात एक मानाचा तुरा आहे या गुणवंत विद्यार्थांचे बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेबजी जाधव साहेब, उपाध्यक्षा सौ.दिपालीताई जाधव, सचिव बाबासाहेब पाटील , सहसचिव बळीराम भिंगोले गुरुजी, सहसचिव अविनाश जाधव, कोषाध्यक्ष अंकुशरावजी कानवटे, कोषाध्यक्ष साहेबराव जाधव , सदस्या श्रीमती कुमुदिनीताई जाधव,सदस्य सुरज पाटील , प्राचार्य प्रल्हादराव जाधव , वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य दिलदार पठाण, पर्यवेक्षक प्रा. विरभद्र बिरादार ,प्रा.मनोजकुमार माने, साधू हंबीर, मु.अ. सुनीता फफड तसेच प्राध्यापक, शिक्षक आदीनी अभिनंदन केले.

# खळाळल्या शृंखला पुस्तकाचे प्रकाशन शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते



**उदगीर (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य साहित्य आणिसंस्कृतीमंडळाचे सदस्य तथा प्रसिद्ध साहित्यिक धनंजय गुडसूरकर यांच्या मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्याचा इतिहास यावर आधारित खळाळल्या शृंखला या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षणमंत्री ना. दीपक केसरकर यांच्या हस्ते मुंबई येथे संपन्न झाले.

हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या ७५ व्या वर्षानिमित्ताने धनंजय गुडसूरकर यांनी मुक्तीसंग्रामाच्या योगदानाचा संक्षिप्त आढावा या ग्रंथात घेतला आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्याचा इतिहास येणाऱ्या पिढीला करुन देणे हे आपले कर्तव्य समजून धनंजय गुडसूरकर यांनी या ग्रंथाचे लेखन केले आहे.

यावेळी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण व बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे , मराठवाडा साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा लातूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके , लेखक धनंजय गुडसूरकर व इतर मान्यवर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शालेय शिक्षण मंत्री ना. दीपक केसरकर व क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजयजी बनसोडे यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्याचा इतिहास या विषयावर धनंजय गुडसूरकर यांनी पुस्तक लिहिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

धनंजय गुडसूरकर यांनी ग्रंथ लेखनामागची भुमिका व्यक्त करताना म्हटले, मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्याचा अमृत महोत्सव आपण साजरा केला. या स्वातंत्र्य लढ्यातील शहिदांना स्मरण करणे व हा इतिहास जीवंत ठेवणे यासाठी मी या पुस्तकाचे लेखन केले आहे.

जिल्हा परिषद लातूरचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले तर आभार धनंजय गुडसूरकर यांनी मानले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन राष्ट्रपती आदर्शशिक्षकपुरस्कार प्राप्त सहशिक्षक विश्वनाथ मुडपे, प्रा. कुमार बंडे, एनसीसी प्रमुख बालाजी मस्कावाड, प्रा. धनराज बंडे, विवेक होळसंबरे, वर्षाराणी मुस्कावाड व इतर मान्यवरांनी केले आहे.

**घर विकणे आहे**

**शिवाजी महाविद्यालय/ विद्यावर्धिनी हायस्कुलच्या पाठीमागे नई अबादी उदगीर येथील बलराम रामचंद्र येरमे यांचे घर ज्याची साईज ८० ८० दोन मजली घर ज्यात सर्व सोईनी युक्त असलेल्या ३१ रुम विकणे आहे.**
**संपर्क ९८२३६३२३००, ९४२३३४७७५०, ९०९६४२४०४२**

**सहयोग अर्बन को-ऑप बँक लि.उदगीर**
शास्त्री कॉलनी, नवी आबादी, नगर परिषदेच्या पाठीमागे, उदगीर ४१३५१७

**जाहीर सुचना**

Re- KYC अद्यावत KYC कागदपत्रे पुनश्च सादर करणे बाबत.

बँकेच्या सर्व खातेदारांना सूचीत करण्यात येते की, भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे बँकेला ग्राहकांच्या खात्यांसाठी, ग्राहकांची अद्यायावत (Updated) केवायसी कागदपत्रे वेळोवेळी प्राप्त करणे बंधनकारक आहे. तसेच विद्यमान Prevention of Money Laundering Act, 2002 च्या तरतूदीनूसार आपल्यावर देखील केवायसी कागदपत्रे देण्याचे बंधन आहे. ग्राहकांनी बँकेस, बँकेच्या मागणी अनुसार आपली अद्ययावत KYC कागदपत्रे त्वरीत सादर करावीत ही विनंती. तसेच सध्या आपण खात्यावर खातेव्यवहार करीत नसल्यास, पुन्हा आपले व्यवहार सुरु करावेत. यासंबंधी शाखास्तरावर उपलब्ध करण्यात आलेले KYC फॉर्म भरुन आम्हास सहकार्य करावे.

आम्ही आपल्याला KYC कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी सदर जाहीर नोटीस सूचना देत आहोत आपण सदर नोटीसीच्या दिनांकापासुन ३० दिवसांचे आत KYC कागदपत्रांची आवश्यक पूर्तता करावी. आपल्या खात्यासाठी KYC कागदपत्रांची पूर्तता न केल्यास रिझर्व बँकेच्या मार्गदर्शी सुचनेनूसार, बँकेला आपल्या खात्यावरील व्यवहार थांबविणे नाईलाजास्तव भाग आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

कृपया अधिक माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी आपले संबंधीत शाखाव्यवस्थापक यांच्याशी त्वरीत संपर्क साधावा. आम्हास आपल्या सक्रीय सहकार्याची अपेक्षा आहे.

उदगीर, दिनांक ०४/०६/२०२४ — डोळे नारायण नागेश, मुख्य कार्यकारी अधिकारी